

# श्री साईलीला

टेंबर कि. ५० पैसे १९६९

# या अंकांत—


१ संपादकीय
२ वाचकांचा पत्रव्यवहार
३ मागे जें जें त्यास तें तें लाभे
४ देवस्थानसंपदेचा सदुपयोग
५ दृश्यांतून अदृश्याकडे
६ घेईं उद्धरून याच जन्मीं
७ श्रद्धा आणि निष्ठा
८ हरि अद्वितीय व अकाल
हीं तीन नावें कोणाचीं ?
९ श्रीगोंदवलेकर महाराजांच्या
हितोपदेशाच्या गोष्टी
१० चंद्रवीरास प्रणाम
११ मनांत आलं कीं.........
१२ स्फूर्ति
१३ दुसरा डोळा कधीं उघडणार ?
१४ श्रीगुरुपौर्णिमा उत्सव १९६९
१५ देई " अढळपद "
१६ सोमवारीं देव नाचले
१७ शिरडी-वृत्त



# श्री साई वाक्सुधा

तुमचें वास्तव्य कुठेंही असो. माझ्यावर श्रध्दा ठेऊन जें कांहीं मागाल तें तुम्हाला मिळाल्याशिवाय सहसा राहणार नाहीं. कारण रात्रंदिवस मी तुमच्या पाठीशी उभा आहें. मी इकडे आहें आणि तुम्हीं सातासमुद्रापलिकडे कुठें तरी असाल. तुम्ही कांहीही करा तें मला समजल्याशिवाय रहाणार नाही, या पृथ्वीच्या पाठीवर तुम्ही कुठेही जा; मी सतत तुमच्याबरोबर आहें, माझें घर तुमच्या हृदयांत आहे, ही गोष्ट कधीही विसरूं नका,

—श्रीसाईसच्चरित


श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक. ]

वर्ष ४८ वें ] सप्टेंबर १९६९ [ अंक ६ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ,

प्लॉट नं ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# ❀ संपादकीय ❀

प्रिय वाचक—

या अंकात श्री. निवृत्ती दौ-फार्णे यांच्या एका पत्रास मुद्दाम प्रसिद्धी देण्यांत येत आहे. त्यांनी आपले प्रामाणिक मनोगत कळविल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. त्यांच्याप्रमाणे इतर वाचक-वर्गणीदारांनीही आपापली मते जरूर कळविण्याची तसदी घ्यावी, अशी नम्र विनंती आहे. त्यामुळे साईलीलेच्या वाचकांच्या आवडीनिवडी नि गरजा आम्हांला समजतील.

सदर पत्रलेखकाची, अंकाची पृष्ठे वाढविण्याची नि साईबाबांसंबंधी जास्त लेख प्रसिद्ध करण्याची सूचना ग्राह्य नाही असे कोण म्हणेल ? आम्ही त्यांच्या सूचनेशी सहमत आहोंत. प्रश्न आहे तो त्यामुळे वाढणाऱ्या खर्चाचा.

साईलीलासाठीं आजच बराच खर्च होत आहे. खर्चाच्या बाबी वाढवण्याच्या असल्यास मासिकाचा खपही जास्त झाला पाहिजे. निष्ठावान भक्तांनी खप वाढविण्यास मदत केल्यास मासिकाचा आकार वाढवून ते आणखी आकर्षक करतां येईल.

त्यांनी पुढें आणलेला दुसरा मुद्दा म्हणजे गेल्या अंकापासून साईलीलेत मराठी न जाणणाऱ्या साईभक्तवाचकांसाठी सुरू करण्यांत आलेला इंग्रजी विभाग. इंग्रजी विभागासह प्रसिद्ध करण्यात आलेला गेला अंक हा पहिलाच होता. त्यामुळे मराठी विभागाची आठ पाने कमी झालीं असलीं तरी यापुढें तसें काही होणार नाहीं. नेहमीप्रमाणें मराठी विभाग तूर्त तरी ४८ पानांचाच राहील. त्यांत छाटाछाट होणार नाहीं.

मराठी न जाणणाऱ्या मद्रास-बंगालकडील व मुंबईतील अनेक वाचकांकडून इंग्रजी विभाग सुरू करावा अशी सूचना गेल्या अनेक वर्षांपासून केली जात आहे. त्या सूचनेचा हा अल्पारंभ आहे. ती व्यवहार्य व वाचक आणि प्रकाशक यांच्या दृष्टीनें सोईस्कर ठरली तरच ती पुढें चालू राहील आणि कोणी सांगावें ? यांतूनच श्रीसाईबाबांच्या कार्याला वाहिलेल्या स्वतंत्र इंग्रजी मासिकाचा जन्म होणार नाहीं कशावरून ? 'तो हा न करील काय ?' बाबांची कृपा झाली व या कार्यास अधिकाधिक व्यापक स्वरूप यावें अशी त्यांची इच्छा असल्यास ते जरूर त्यांना प्रेरणा देऊन हें कार्य पार पाडून घेतल्याशिवाय राहणार नाहीत. तो भाग्याचा दिवस शक्य तों लौकर उगवावा हीच आमची आकांक्षा आहे.

—संपादक

# वाचकांचा पत्रव्यवहार

## साईलीला इंग्रजी विभाग

महाशय :—

संपादकसाहेब यांना निवृत्ती उर्फ ईश्वर दौलतराव फार्णे मु. फार्णेवाडी, पो. बोरगाव. ता. वाळवे, जि. सांगली यांसी विनंती ऐसीजे.

टपाल पाठविणेस कारण की, आपण इंग्रजी विभाग सुरू केला आहे व सूचना वाचली आहे. पण मी दोन महिन्यांपूर्वी सूचना केली आहे कीं हा अंक वाचकांस फारच तोकडा पडत आहे. तरी तो महिनाभर. पुरेल इतका मोठा निघेल ही गरज दूर व्हावी व त्याचे उत्तरही मिळाले कीं विचारासाठी पुढे पाठविले आहे. तरी कृपा करून इंग्रजी विभाग बंद करून मराठी वाचकांची पाने वजा करूं नयेत. मुंजीचे मुहूर्तावर मुलीचें लग्नही उरकूं लागलों तर दोन्ही कामे अपुरीच होणार. माझी मागील सूचना लक्षात ध्यावी, महिनाभर आम्हास साईनामाचे ताट अपुरें पडतें, अर्धपोटी होतें. त्यातच इंग्रजीचा मोक्का त्याच ताटात बसवला तर दोघेही उपाशीपोटीच. कोणाचेंच समाधान होणार नाहीं. तरी इंग्रजीकरिता इंग्रजी अंक काढा, त्यांचीही सोय करा. ज्या प्रांताची जी भाषा असेल त्या भाषेत त्यांची सोय करा, पण आम्हास साईनामापासून उपाशी ठेवू नका, ते पूर्ण ताट करा. अंक मोठा करा. ५ रु. वर्गणी १५ करा, २० करा पण भक्तांचे समाधान करा. बाबांची व बाबांचे रूपाने अनेक संतांची, देवादिकांची, महापुरुषांची ओळख व त्याचे अमृततुल्य ज्ञान प्यावयाचें आहे. बाबांचे रूपाने जगाची व पृथ्वीतील ईश्वरशक्तीची ओळख भक्ताना होणें अगत्याचे आहे. याकरिता अंक आकारानें मोठा व लिखाणाने समृद्ध झालेला पाहिजे. किर्लोस्कर, वसंत, हंस यांचे दिवाळी अंकासारखा मोठा पाहिजे आहे. सर्वच बाबांचे करितां भक्त झालेले नाहीत. तर जे संकटाने, प्रसंगाने, महागाईने, गरीबीने, श्रीमंतीने ग्रासलेले आहेत, त्याना खरा आधार, जिव्हाळा पाहिजे आहे, तो या ठिकाणी, कमीजास्त, प्रमाणांत, ज्याचे त्याचे कर्मानुसार

मिळत आहे. समाजाची व भक्तांचीं जी मनें अनेक संकटग्रस्त काळजीने रोगमय झाली आहेत, त्याना साई अंकाचे औषधाने निरोगी ठेवण्याचा प्रयत्न जितका करता येईल तेवढा करावा व तो मजकूर जास्त प्रमाणांत उतरावा. माझी पूर्ण खात्री आहे व अनेकाना अंकाची जडीबुट्टी मी वापरण्याचा प्रयत्न करीत आहें. वर्गणीदार वाढवीत आहे. माझे विचारात साईभक्त सहमत आहेत. मी सर्वांचे विचार माझे रूपानें पोचवीत आहे. तरी बाबांचे चरणी भक्ताची विनंती मान्य व्हावी.

◆

# मागे जें जें त्यास तें तें लाभे

**श्री. जयप्रकाश पद्मनाथ बाबरेकर, आत्माराम सदन, मु. पो. बाणगांव, जि. ठाणें हे आपला अनुभव पुढीलप्रमाणें कळवितात.**

वरील श्री बाबांच्या उक्तीचा अनुभव मला तंतोतंत आला, तो असा— मी मुंबई विद्यापीठाच्या इंटर आर्ट्‌सच्या परीक्षेत प्रथम नापास झालों, म्हणून पुन्हा एकदा परीक्षेस बसून पाहावे असा निर्णय घेतला. श्री. बाबांवर माझा पूर्ण विश्वास. तसेच त्यांच्या ' श्रद्धा व ' सबुरी ' ह्या शब्दाना मी यशरूपी फळाची फुलेच मानतों, त्यामुळें त्यांच्यावरील श्रध्देनें मी पुन्हा अभ्यासास सुरवात केली. तसेच प्रथम नापास झालो म्हणून विशेष खंत न करतां, अभ्यास अपुरा पडला म्हणून नापास झालो अशी मनाची समजूत केली; व पुढील तयारीस लागलों. वडिलांच्या मताप्रमाणें इंटरच्या एका क्लासला सुध्दां जाऊ लागलों. ह्या वेळी अभ्यास खूप करण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें आक्टोबरपर्यंत अभ्यास पूर्ण केला. त्यामुळें आतां मी नक्की पास होणारच असा आत्मविश्वास वाटू लागला. त्याप्रमाणें मी आक्टोबर १९६८ मध्यें परीक्षेस बसलों. पेपर चांगले गेले त्यामुळें अधिक विश्वास बळावला. परीक्षा झाल्यानंतर मी नक्की पास होणार म्हणून घरी सांगून सुद्धां टाकलें; परंतु 'दैवाच्या गती कांही वेगळ्याच असतात,' असें म्हणतात ना.–माझा परीक्षेचा रीझल्ट डिसेंबरमध्ये लागला व त्यानुसार मी पुन्हा अनुत्तीर्ण झाल्याचें समजलें, तेव्हां मात्र मला जबरदस्त धक्काच बसला; केलेले सर्व प्रयत्न निराशेच्या खाणीत गेलेले होते. पुन्हा परीक्षेस बसावे म्हणून मन धजेना परंतु अखेर मार्कलिस्टनुसार कोठल्या विषयांत गेलो हे पाहावे म्हणून युनिव्हर्सिटीतून मार्कलिस्ट आणलें. मार्कलिस्टनुसार मी

अगदीच थोड्या मार्कांकरितां नापास झालों होतों. पुन्हा एक आशेचा किरण डोक्यांत चमकला व त्यानुसार मी माझ्या पेपरांची फेर तपासणी केली. परंतु पुन्हा निराशेचा वाटाच हाती आला.

पुन्हा परीक्षेस बसूं नये असेंच वाटत होतें. कारण मनांत नैराश्याची छाया उमटली होती, आणि मार्चमध्ये होणाऱ्या परीक्षेस फक्त तीनच महिने राहिले होते. ह्या अवधीमध्ये, इंग्रजी ह्या विषयाचा अभ्यासक्रम बदललेला होता म्हणून तो सर्व वर्षाचा अभ्यास तीन महिन्यांत करणें अवघड वाटत होतें.

परीक्षेंतील निराशेमुळें तर मला परीक्षेचा खूप वीट आला होता. परंतु विचारांतीं पुन्हां तिसरा व शेवटचा प्रयत्न करण्याचें मी ठरविलें. व हा भार संपूर्णतः मी बाबांवरच टाकला. कारण ह्यावेळेस नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें पाहिलें असता अपेक्षा फारच कमी वाटत होती.

अखेर, परीक्षेचा फॉर्म भरून अभ्यासाला लागलों. तीन महिन्यांत जुन्या अभ्यासक्रमासह नवीन अभ्यासाचा धांवता अभ्यास केला. परिक्षा आली त्या वेळी मी बाबांपुढे माझे सगळें मागणें निवेदन केलें, व "बाबा, आता तरी लक्ष द्या" अशी विनंती केली. पुढे परीक्षेस बसलो. सर्व पेपर व्यवस्थित लिहिले व विशेष म्हणजे इंग्रजी नवीन अभ्यासक्रमाच्या पेपरांत मी ऐन वेळेवर जे जे केलें होतें तेंच आलें. त्यामुळें तो पेपर मी अपेक्षेपेक्षा चांगला लिहूं शकलो. अर्थातच त्यामुळें मला थोडा आशेचा किरण दीसूं लागला. परंतु रिझल्ट लागे-पर्यंत मात्र छातींत धडकच होती. अखेर दोन महिन्यांनंतर आमचा रिझल्ट लागला. मी मागील धक्क्यांनी खचला गेल्यामुळें रिझल्ट बघण्यास गेलोच नाही. परंतु सुमारे ११॥ वा. माझी बहीण वर्तमानपत्र घेऊन आली व त्यात मी उत्तीर्ण झाल्याचें सांगितलें. नंतर मी पेपर पाहिला मी खरोखरच उत्तीर्ण झालो होतो. प्रथम ह्यावर माझा विश्वासच बसेना.

मला अत्यानंद झाला तो हा की, बाबांनी माझ्याकडे लक्ष दिलें होतें. माझा नवीन अभ्यासक्रम असून सुद्धा माझ्या विनंतीस, प्रार्थनेस त्यानी यश दिलें होतें. खरोखरच बाबांची लीला अगाध आहे. आता माझी त्यांच्यावरील श्रद्धा अधिक दृढ झाली आहे; कारण त्यांचे साहाय्य ह्यापुढेही लाभणार ह्याची मला खात्री झाली आहे. खरोखरच, बाबा आपल्या भक्ताची मागणी पूर्ण करतात, म्हणून पुनः पुनः त्यांची उक्ती आठवते. ती-'मागे जें जें त्यास तें तें लाभे ॥',

---

# देवस्थानसंपदेचा सदुपयोग

लेखक—श्री. आप्पाराव

जग झपाट्याने बदलत आहे. या बदलत्या जगाला आपण पुरून उरलें पाहिजे. परंपरेने चालत आलेल्या चालीरीतींना चिकटून राहिल्याने आजच्या काळांत आपला निभाव लागणार नाहीं. आपण गतिमान झालें पाहिजे. आपणास सभोंवारच्या जगाबरोबर पुढें पुढें जावयाचें आहे. एकाच जागी थांबून कसें चालेल? थांबला तो संपला! आपण एकाच स्थानाला खिळून रहायचें नाहीं, गंगौघाप्रमाणें सतत वहात पुढें पुढें जात राहिलें पाहिजे.

भारतांत सर्वत्र जागोजाग मंदिरें आहेत, मंदिरें म्हणजे पूजास्थानें, श्रद्धास्थानें. भक्तांच्या अंतःकरणाला दिलासा व विसावा देणारी पवित्र स्थानें, शेकडो वर्षांपासून भक्तांना आदरणीय नि श्रध्देय होऊन राहिलेली स्थाने.

कोणत्याही कारणामुळे पिडलेले, संकटांत सापडलेले व निराशेने झापडलेले असंख्य भक्त विसाव्यासाठी व दुःखमुक्त होण्यासाठी देवमंदिरांत येतात, देवाला आळवितात व शक्तिनुसार नाना प्रकारचे नवस सायास करतात. त्यांपैकी सर्वांनाच इच्छापूर्तीचें भाग्य लाभते असें नाहीं. परंतु एक प्रकारचें सात्त्विक समाधान लाभतें हें मात्र खरें.

कांही देवस्थाने जागृत असतात. जागृत म्हणजे नवसाला पावणारी, भक्तांची इच्छा सफल करणारी. अशा देवस्थानांकडे भक्तांची ये-जा सतत मोठ्या प्रमाणांत चालू असते.

आंध्र प्रांतातील तिरुपति येथील श्री व्यंकटेश्वर मंदिर हें अशा स्थानांपैकी एक प्रमुख क्षेत्र आहे. भारतांतील कोणत्याही भागांत राहाणारा गृहस्थ असो.

तो आंध्र प्रांतातील एखाद्या भागांत गेला असतां तिरुपतीच्या व्यंकटेश्वराचे दर्शन घेतल्याशिवाय रहाणार नाही. हे मंदिर म्हणजे एक फार मोठें सुसंपन्न संस्थानच आहे. रोजच्या नैवेद्यासाठी नाना प्रकारची पक्वान्नें तयार केली जातात. त्यापायी रोज हजारो रुपयांचा खर्च होत असतो. तेथें मिळणाऱ्या प्रसादावर भक्तांची व इतर लोकांची गुजराण होत असते.

भारतांतील एक अत्यंत सुसंपन्न, सुव्यवस्थित व जनतेच्या कल्याणासाठी कटाक्षानें झटणारें हें देवस्थान आहे. या देवस्थानतर्फे जें शिक्षणकार्य तिरुपति व आसपासच्या भागांत चालू आहे त्याच्या व्यापाच्या दृष्टीनें इतरत्र तोड क्वचितच सांपडेल. प्राथमिक, दुय्यम शिक्षणसंस्था अनेकानेक पोसण्यांत येत आहेतच; परंतु त्याशिवाय तिरुपति येथें जी श्रीव्यंकटेश्वर युनिव्हर्सिटी चालू आहे तिचा व्याप विस्तार फार मोठा आहे. हें सर्व शिक्षणकार्य किंवा आरोग्य-रक्षण-कार्य देवस्थानाकडून जो आर्थिक सहकार मिळतो त्याच्या बळावर चालू शकतें. देवस्थानची तिजोरी सुसंपन्न असल्याशिवाय का हा व्याप सांभाळतां येईल ?

लक्षांत घेण्याजोगी गोष्ट म्हणजे देवस्थानच्या चालकांनीं आजच्या काळातील आपलें पवित्र कर्तव्य कोणतें हें बरोबर ओळखलें आहे. भक्तांकडून येणारा अपरंपार पैसा तिजोरीत साचवून किंवा कुजवून ठेवण्यापेक्षा त्याचा वापर जनतेच्या कल्याणासाठी व सर्वांगीण उन्नतीसाठीच केला पाहिजे. श्री व्यंकटेश्वर अशा मार्गानें गेलें असतांच आनंदी व प्रसन्न होईल हें चालकांनीं बरोबर ओळखलें आहे.

हें सर्व लिहिण्याचें कारण आहे. सध्यां आपण औद्योगिक जगांत वावरत आहोंत, नाना प्रकारचे उद्योगधंदे काढणें, ते चालविणें तसेंच ज्यांना उद्योगधंदे सुरू करायचे असतील त्यांना आर्थिक पाठबळ देणें, व अशा रीतीने पैसे मिळविण्याचें व त्यांना सुखी होण्याचें साधन निर्माण करून देणें हीसुद्धां आजच्या जमान्यांतील एक महत्त्वाची गरज आहे, योग्य तारणावर धंदेवाईकांना, प्रामाणिकपणें धंदा चालवू पहाणाऱ्यांना भांडवलाची सोय करणें आज जरुरीचें आहे.

तिरुपति येथील वेंकटेश्वर मंदिराच्या चालकांचें लक्ष सध्या या कालोचित प्रश्नाकडे वळलें आहे किंवा वळविण्यांत आलें आहे.

आंध्र प्रांतांत 'रायलसीमा' या नावाचा एक जिल्हा आहे. त्या भागांत वारंवार दुष्काळ पडतो आणि त्यामुळे त्या भागांतील लोकांचे फार हाल होतात, त्यांचे ते हाल टाळण्यासाठी कांहीं ना कांहीं योजना करणें अत्यावश्यक झालें आहे. त्या भागांतील जनतेंत शक्य होणारे उद्योगधंदे सुरू करणे व मानवशक्ति त्या कार्याकडे वळवून लोकांना अर्थार्जनाची सोय करून देणें जरूर आहे. आज पीक-पाणी नाहीं मिळालें तरी पैसा मिळाला पाहिजे. आणि पैसा मिळविण्यासाठीं लोकांना नाना प्रकारच्या उद्योगधंद्यांना जुंपण्यांत आलें पाहिजे.

आणि याच हेतूनें तेथें 'स्टेट स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हेलपमेंट कार्पो-रेशन' या नावाची लहानसहान धंदेवाईकांना उत्तेजन देणारी, त्यांचें मार्गदर्शन करणारी व त्यांच्या मार्गांतील अडचणी दूर करून त्यांना 'मार्गस्थ' करणारी संस्था स्थापन करण्यांत आली आहे. हिचें सध्याचें भांडवल आहे पन्नास लक्ष रुपये आणि तें मिळवायचें आहे तिरुपति येथील व्यंकटेश्वर मंदिराच्या खजिन्यांतून.

उपरोक्त कार्पोरेशनने एक सुटसुटीत औद्योगिक योजना तयार केली असून भांडवलाची अपेक्षा व्यंकटेश्वर मंदिराकडून करण्यांत आली आहे. या एवढ्या मोठ्या रकमेला कोणी ना कोणी लायक माणसाने जामीन राहिलें पाहिजे, हमी दिली पाहिजे. ती हमी आंध्र सरकारने पत्करावी अशी अपेक्षा बाळगण्यांत आली असून ती सफल झाल्याशिवाय रहाणार नाहीं, अशी चिन्हें दिसत आहेत.

येथें मुख्य मुद्दा आहे तो म्हणजे देवस्थानचा पैसा, लोककल्याणासाठीं बाहेर काढण्याचा व तो खेळता ठेवण्याचा. जनतेच्या दृष्टीत कालानुरूप केवढा क्रांतिकारक थारेपालट घडून येत आहे, त्याचा हा प्रत्यक्ष पुरावा आहे.

लक्ष्मीचा वरदहस्त असलेल्या तिरुपति येथील श्री. वेंकटेश्वर मंदिराच्या चालकांनी साचून राहिलेल्या संपत्तीचा उपयोग लोककल्याणकार्याकडे करण्याचा जो उपक्रम चालू ठेविला आहे, तो अत्यंत स्तुत्य नि अनुकरणीय असाच अहे.

त्या दृष्टीनें अर्थात सुसंपन्नतेच्या दृष्टीनें पहातां श्री साईबाबांचें शिरडी संस्थान हें अत्यंत लहान आहे; लहान असेना का; परंतु त्या संस्थानच्या

व्यवस्थापकांनीं जें लोककल्याणकारी धोरण गेल्या अनेक वर्षांपासून स्वीकारलें आहे तें स्तुत्य नि अभिनंदनीय आहे. आपल्या शक्तिनुसार हें संस्थान शिक्षण-प्रसार नि जनतेचें आरोग्य सांभाळण्याच्या दृष्टीनें जें उपयुक्त कार्य अव्याहत करीत आहे तें आजच्या काळास सर्वतोपरी शोभण्यासारखें आहे.

हें चालू कार्य व इतर अनेक लोककल्याणकारी व जनतेला सुखासमाधानानें जगतां यावें या सद्धेतूनें अनेक कार्यांचा भार संस्थानचालकांना शिरावर घ्यावयाचा आहे.

आणि त्याच उद्देशानें कांहीं महिन्यांपूर्वी श्रीसाईबाबांचा जो ५० वा पुण्यतिथ्युत्सव मोठ्या समारोहानें साजरा झाला त्यावेळीं श्री साईबाबा फौन्डेशनची स्थापना करण्यांत आली आहे. या फौन्डेशनच्या विश्वस्त मंडळांत महाराष्ट्रराज्याचे फडणीस श्री एस्. के. वानखेडे, शेतकीमंत्री श्री. पी. के. सावंत, महाराष्ट्र ले. कौन्सिल व महाराष्ट्र राज्यविधि-मंडळाचे अध्यक्ष अनुक्रमें श्री व्ही. एस्. व पागे श्री. टी. एस्. भारदे, तसेंच दिल्लीचे न्या. मू. जे. आर. मुधोळकर वगैरे अनेक थोर मंडळींचा समावेश झालेला आहे. जनता सुखी व समाधानी रहावी, जनतेचीं दुःखें दूर व्हावीं यासाठीं तर साईबाबांचा अवतार होता. जीवनभर त्यांनीं तेंच कार्य केलें व अहर्निश त्यासाठीं ते झटले. त्यांच्या त्या उद्देशानुरूप संस्थानचालकांनीं कार्याचा डोलारा उभारणें व तें जोमानें चालविणें जरूर आहे. या कार्यांत गोरगरीब व धनिक जनतेनें आपापल्या परीनें शक्य तो सहकार दिला पाहिजे व जें कार्य बाबांच्या अत्यंत आवडीचें व जें त्यांच्या नावें चालविण्यांत येत आहे, त्याला आर्थिक हातभार जरूर लावला पाहिजे.

ठायीं ठायीं असलेले बाबांचे भक्त या कार्यास हातभार लावण्यासाठी भक्तिभावाने नि उत्साहाने पुढे येतील अशी आम्हांला खात्री वाटते. तशी प्रेरणा बाबा सर्वांना देवोत व साईबाबा फौंडेशनचे कार्य भरभराटीस येवो, हीच आमची प्रार्थना आहे.

---

# दृश्यांतून अदृश्याकडे

लेखकः श्री. द. दे. आंबेकर

अदृश्य शक्तीवर विश्वास ठेवून अंधश्रद्धेने जीवनाची वाटचाल करण्यापेक्षां पृथ्वीतलावर प्रत्यक्षात दृश्यस्वरूपांत दिसणाऱ्या वस्तूंची उकल करून समोर दिसणाऱ्या ऐहिक सौख्याचा आस्वाद न घेतां अदृश्य शक्तीच्या मागे लागून ऐहिक सुखाचा त्याग करणें सकृद्दर्शनीही अंधश्रद्धा भासते. पण गंमत अशी की, चौकसपणें अवलोकन केल्यास असे दिसुन येईल; की; दृश्यापेक्षां अदृश्यशक्तीचें पृथ्वीतलावर प्रत्यक्षांत प्रमाण जास्त दिसून येईल, याचें प्रत्यंतर पंचमहाभूतांशी संलग्न असलेला हा मानवी देह देखील अदृश्य शक्तीतच सामावलेला आढळेल. काम, क्रोध, भय, मैथुन आहार निद्रा या साऱ्यांचं स्वरूप अदृश्य स्वरूपांत सामावलेलं आहे. दृश्यरूपानं दिसणारी कोणतीहि वस्तू मिथ्या असूं शकत नाही. जीवित अशाश्वत असल्यामुळे मानवाला ते चिरस्थायी ठेऊ शकत नाहीं. मानवी देहाशी त्याचे स्वरुप क्षणभंगुर ठरते (राहील) ते शाश्वत राहु शकणार नाहीं. शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठीं पृथ्वीवर दिसणाऱ्या दृश्य रूपाचे सहकारानें जीवनाचा प्रवास करावा लागेल. या दृश्य रूपांत दिसणाऱ्या सुखातच जर आपण आसक्त झालों तर अदृश्यांत असणाऱ्या शाश्वत सुखापासून आपण पारखे होऊं. दृश्यातून अदृश्याकडे जाण्यासाठी बुद्धिरूपी मानवी देह हें एकच साधन आहे.

या साधनाचा जर आपण उपयोग करून घेतला नाहीं तर मानवी देहाच्या उद्देशापासून आपण दुरावूं. क्षणभंगुर दिसणारे साकार हें देखील सत्य आहे. मात्र शाश्वत सुखासाठी मानवाला अदृश्य शक्तीकडेच धांव घेतली पाहिजे. त्यासाठी या क्षणभंगुर सुखाची सत्यता अंतःकरणांत दृढ व्हावयास पाहिजे. अदृश्य शक्तीचा विश्वास त्याच्या ठिकाणीं दृढ झाला नाहीं तर तो शाश्वत सुखाचा अनुभव घेऊ शकणार नाहीं. समोर दिसणारे सुख हें क्षणभंगुर आहे. याचा ठसा त्याच्या अंतःकरणांत ठसणे आवश्यक आहे. नसतां त्याचे चित्त क्षणभंगुर सुखाच्या ठायीं केंद्रित झालेलें असल्यामुळें त्याची दृष्टि क्षणभंगुर सुखाच्या पलीकडे पोहोंचू शकणार नाहीं. अदृश्य शक्तीचा विश्वास मनांत

निर्माण होणें हे सामान्य नाहीं. त्यासाठीं त्याच्या अंतःकरणाचा ओढा अदृश्य शक्तीकडे केंद्रित होऊन, क्षणभंगुर जीविताचें सत्य स्वरूप त्याला ओळखता आले तरच तो अदृश्य शक्तीकडे ओढला जाऊं शकेल. तरी पण काम, क्रोध, लोभ, दंभ, मत्सर आदि षड्विकार हे मानवाला क्षणभंगुर जीविताचें सत्यस्वरूप ओळखण्याच्या मार्गांत अडथळे निर्माण करतात. यासाठीच मानवाला षड्विकारांवर आधिपत्य गाजवता आलें तरच तो अदृश्य शक्तीचें खरें स्वरूम ओळखण्यास पात्र होऊं शकेल.

# घेई उद्धरून याच जन्मीं

कृपाघना साई घेई धाव घेई
ठेवितसे पायीं डोई तुझ्या
तूंच तारियेले, जीवन दिधले
तूंच साईदेवा जगी या आणिले =१=

नको नको देवा संकटाचा भार
ठेवी तूं मायेचा कर शिरावर
कृपेची पाखर घाली आम्हांवर
मग आम्हा या जगी उणे नाहीं =२=

तुझा आशिर्वाद हेंचि आम्हा धन
वाहूं तनमन तुझ्या पायीं
नको नको देवा कसला हव्यास
फक्त आरोग्याचें दान देई =३=

म्हणुनि पायासी माझी विनवणी
साई घे ऐकोनी भक्तासाठीं
नको नको साई पुन्हा मला जन्म
घेई उद्धरून याच जन्मीं

सौ. श्री शहाणे; डोंबिवली.

# श्रद्धा आणि निष्ठा

लेखक : श्री. द. दे. अंत्रेकर

पाषाणाला साकार रूप देऊन प्रत्यक्षांत आपआपसांत वैमनस्य, द्वेष, मत्सर, इतर प्रेरणेचे दृश्य या गोष्टीला पाश्चात्यांनी उपहासाने न पाहिले तरच नवल ! परंतु निर्जीव वस्तूलाहि साकार रूप देण्याची पूर्वजांची सखोल दृष्टी पाहिली म्हणजे मति गुंग होते, याचा उगमही चिकित्सक व डोळसपणें झालेला आहे, कालान्तराने त्याला विकृत स्वरुप आलें तो भाग वेगळा ! त्याचेंच पर्यवसान अंधश्रद्धेकडे झालें, शतकानुशतकें परकीयांची आक्रमणें सहन करून गुलामगिरीच्या बंधनाखालीं खऱ्या धर्माची स्वरूपें बाजूस पडून त्याला विकृत स्वरूप प्राप्त झालें व त्याचे मूळ स्वरूप झाकलें गेलें, तें इतकें कीं दीडशें वर्षे राज्यकर्ते म्हणून राहिलेल्या चिकित्सक बुद्धीच्या ब्रिटिशांनाहि या खऱ्या धर्माचें अंधुकसें दर्शनहि झालें नाहीं.

मानवी कल्याणाच्या दृष्टीने ही शोकांतिका आहे. या उलट राजकर्त्यांना या खऱ्या धर्माचें अंधुकसें दर्शन झालें असतें तर मानवी कल्याणाच्या दृष्टीने ही घटना स्वागतार्ह ठरली असती. याची जाणीव विवेकानंदांना बरोबर झाली म्हणूनच पाश्चात्यांना भारतीय संस्कृतीचें महत्त्व पटवून देण्याची तळमळ त्यांच्या ठिकाणीं निर्माण झाली. शिकागो येथें सर्व धर्म परिषदेत त्यांचा प्रत्येक शब्द पोटतिडकीनें जिव्हाळ्याने हृदयांतून बाहेर पडत गेला. भारतीय संस्कृतीचें दर्शन ब्रिटिशांना झालें असतें तर प्रत्येक प्रत्येक गोष्ट चिकित्सपणें व डोळसपणें त्यांनी अवलोकन केली असती. आणि खऱ्या ज्ञानाची वाढ होऊन मानवी कल्याणाच्या दृष्टीनें तें हितकारक ठरलें असतें.

दुःख याचें होतें कीं आजहि अनेक गोष्टी बुद्धीला पटूनहि सामाजिक रीत्या उघडपणें पुरस्कार करण्याचेंहि धैर्य आमच्यांत नाहीं. चिकित्सक आणि

…ळसपणें पाश्चात्त्यांचे अनुकरण करणें मुळींच गौण नाहीं. परंतु त्याच पद्धतीनें …धर्माकडे पाहून बुद्धीला पटणाऱ्या गोष्टीकडेहि, आम्ही दुर्लक्ष करतो. किंबहुना …चे अनुकरण करण्यास आम्हांला धैर्य होत नाहीं. यापेक्षां गुलामगिरीचें …तक दुसरें कोणतें ?

राष्ट्रावर असणाऱ्या परकीय मगरमिठीपेक्षाहि हें भयंकर आहे. उदा० …खादा सूटबूट घालून रस्त्यानें चाललेल्या गृहस्थास मध्यंतरी पाषाणाची सेंदूर …लावलेली मूर्ति दृष्टीस आली, आणि तो जर श्रद्धाळू असेल, तर त्याच्या अंतः-करणाच्या ओढ्यामुळें तो त्या मूर्तीपुढें आपोआपच झुकतो. अशा वेळीं विनम्र …वाने, नतमस्तक होऊन कांहींवेळ स्थिर चित्ताने तेथें थांबावें अशी इच्छा होणें …भाविक आहे. परंतु त्याला तें धैर्य होत नाहीं, आणि तसाच तो मार्गक्रमण …रतो. एकादी कल्पना त्याज्य वाटत असेल तर त्याप्रमाणें अवश्य वागा. परंतु जे …कारार्ह असेल, तिला डाबलणे यापेक्षां अधःपतितपणाचें कोणतें लक्षण …सूं शकेल ?

विवेकानंदानीं शंभर वर्षांपूर्वी शिकागो येथील व्यासपीठावरून भगवी कफनी आणि फेटा, या सन्यस्त वृत्तींतूनच भाषणाचे वेळीं "माझा धर्म" आणि नंतर "बंधू भगिनींनो" अशी सुरवात केली. आणि संपूर्ण जगाला स्वतःच्या व्यक्तिमत्त्वानें आकर्षून घेतलें तें श्रद्धा, आणि निष्ठेच्या बळावरच ! आणि नेमक्या या गोष्टीपासूनच आम्हीं आज दुरावलों. याचेंच पर्यवसान, ज्या राष्ट्रामध्यें सबंध मानव जातीला मार्गदर्शन करणाऱ्या वेदांचा उगम झाला, राम आणि कृष्णासारखे अद्वितीय पुरुष होऊन गेले. उन्नतीच्या अत्युच्च शिखरावर जें राष्ट्र पोहोचलेले होतें, त्याच राष्ट्रावर टीचभर पोटाचे खळगे भरण्यासाठीं, दुसऱ्याकडे याचना करण्याचा प्रसंग यावा ? काय हा दैवदुर्विलास !

आतां आपण वर्तमानकाळाकडे वळूं ! उन्नतीच्या परमोच्च शिखरावरून खालीं आलों हें जरी खरें असलें, भूतकाळाचे पोवाडे कितीहि जरी गाईले, तरी चालू काळाशीं, त्याचें साम्य साधतां आलें नाहीं तर भूतकाळाचें विलीन झालेलें …प समोर ठेवून अश्रू ढाळीत बसण्यापेक्षां आहे त्या परिस्थितींत समाधान मानून, चालू परिस्थितीला तोंड देऊन मार्गक्रमण करणें स्तुत्य नाहीं का ? असा प्रश्न निर्माण होणें सहाजिक आहे.

परंतु कमीअधिक प्रमाणांत याचा धक्का पृथ्वीतलावरील सर्वच मानवजातीला जाणवलेला दिसतो. आणि त्या भावनेतूनच शिकागो येथील निर्माण झालेली सर्वधर्म परिषद आहे असें मानावयास हरकत नाहीं. त्याबरोबरच भूतकाळाचे सिंहावलोकन आम्हा भारतीयांना तरी केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कारण आपल्या भावी उन्नतीचा पायाच मुळीं तेथें आढळतो. त्याशिवाय भविष्यकाळाची वाटचाल करणें आम्हा भारतीयांना शक्य नाहीं.

परकीयांचें जूं मानेवर असतांहि भारतीय विचारांचा प्रवाह विवेकानंदांनी पाश्चात्यापर्यंत पोहोचविला. भारताचे संपूर्ण चित्र स्वामीजींच्या डोळ्यांसमोर स्पष्ट होतें. त्यासाठीं ते म्हणतात "प्रत्येक आत्म्याच्या ठायी अनंतशक्तीचा वास आहे या श्रद्धेतूनच आपला भारत पुन्हा चैतन्ययुक्त होईल".

---

# महात्माजींचे महामंत्र

सत्य थोडक्यांनी प्रतिपादन केले तरी तें सत्यच; उलट लक्षावधींनी जरी असत्याचा पाठपुरावा केला तरी तें वाऱ्यावर उडून जाणाऱ्या कोंड्याप्रमाणें तें नाहींसेही होते.

लहान मुलांनी आपल्यावर धूळ उडवली म्हणून सूर्य कांही त्यांचा सूड घेत नाही. तर त्यामुळे स्वतःलाच ती मुले इजा करून घेतात.

शाब्दिक शक्तीपेक्षा, मग तो शब्द लेखी असो, वा मौतिक असो, विचाराच्या शक्तीवर माझी श्रध्दा अधिक आहे.

शरीरसंवर्धन याला स्वतःचाच असा स्वतंत्र आधार आहे. कोणत्याहि योग्य शिक्षणयोजनेत इतर अनेक विषयांप्रमाणे त्याचा अंतर्भाव करता येईल व केलाहि पाहिजे.

संपूर्ण शुचिता ही स्वयंसिद्ध आहे. तिच्या पुरस्कारासाठी बाह्य पाठबळाची आवश्यकता नाही. या विचारावर माझी पूर्ण निष्ठा आहे.

# हरी अद्वितीय व अकाल हीं तीन नावें कोणाचीं ?

—विनोबा भावे.

## हरी हे अद्भुत नांव

हरि हें अद्भुत नांव आहे, सबंध भारतात रामनामाच्या बरोबरीचे हेंच एक नांव आहे. ज्ञानदेव महाराज म्हणतात –"**एक नाम हरि। द्वैत नांव दूरी।**" एक हरि नाव घेतलें, की दुसरे नांव उरतच नाही. सर्व नांवें त्या एका नांवात येतात. एवढें एक नांव घेतलें की पुरे.

हरि म्हणजे सर्व मायेचें हरण करणारा. पाप, ताप,दुःख, रोग इत्यादि सर्व हरण करणारा आहे हरि. ज्ञानदेव महाराजांनी हरिपाठ लिहिला आहे. महाराष्ट्रात हरिपाठ सर्वांना माहित आहे. ब्राह्मणाची संध्या संस्कृतात आहे आणि त्यात भगवंताची २४ नांवें आहेत, पण तीं संस्कृतात आहेत म्हणून सामान्य लोक समजू शकत नाही. सगळ्यांना समजावें म्हणून ज्ञानदेवांनी मराठीत हरिपाठ लिहिला. तो हरिपाठ महाराष्ट्रात घरोघरी वाचला जातो. त्यात ज्ञानदेवांनी लिहिले आहे –"**हरि मुखे म्हणा हरि मुखें म्हणा ॥ पुण्याची गणना कोण करी.**" त्यानंतर एकनाथ महाराजांनी पण एक हरिपाठ लिहिला. त्यात ते म्हणतात—

> **"हरि हरि बोला, नाहीतरी अबोला।**
> **वृथा गलबला करूं नका ॥"**

असा हरिनामाचा महिमा सगळ्यांनीं गाइला आहे.

असाच हरिनामाचा घोष बंगाल प्रांतात आणि ओरिसा प्रांतात होतो. तेथे म्हणतात 'हरि बोल हरि बोल'. दक्षिणच्या काही प्रांतात रामनामाचा घोष चालतो. तेथे 'राम म्हणा, राम म्हणा' चालते. आम्ही दोन्हीचा समन्वय करून त्याचें 'हरे राम' केलें. तशी तर आम्ही तिन्ही नांवें घेतो–'जय जय राम कृष्ण हरि'.

[असें म्हणता म्हणता हळहळ पाय हालू लागले, टाळ्या वाजू लागल्या, आणि त्याला नृत्याचें स्वरूप येऊ लागले. थोड्याच वेळात सगळ्या लोकांचा आवाजही बाबांच्या आवाजात मिसळला. थोडें थांबून बाबांनी मुलांना विचारलें —कारे तुम्हांला नाचतां येत नाहीं का ? मग काय ? सगळ्यांनीं नाचण्यांतही साथ दिली. 'जय जय रामकृष्ण हरि' च्या घोषानें मंदिर दुमदुमून गेलें. सगळीं नामसंकीर्तनांत तल्लीन झालीत. ]

## ईश्वरासारखा ईश्वरच

'अद्वितीय तू'. अद्वितीय म्हणजे काय ? देवाच्या बरोबरीचा दुसरा कोणी नाही. देव म्हणजे देवच. त्याची बरोबरी कोण करणार ? मोठा मनुष्य असो, महापुरुष असो, बलवान राजा असो की मोठा पहाड असो, देवाची बरोबरी कोणी करू शकणार नाही. ईश्वरासारखा ईश्वरच. आपण त्याचे भक्त होऊ शकतो पण त्याची बरोबरी करूं शकत नाहीं. एकच ईश्वर सर्व सृष्टीला संभाळणारा, सृष्टीला उत्पन्न करणारा, सृष्टीला लीन करणारा आहे. तसा दुसरा कोणीच नाहीं.

हें कोणीहि मान्य करील, कीं ईश्वराची सेवा आपण करावी, बरोबरी नाहीं.पण अद्वितीयचा अर्थ हा की एक ईश्वराचें नांव घेतल्यावर,मोजायला वस्तूच शिल्लक रहात नाही. समजा आपण इथलीं मुलें मोजूं लागलो. राम एक, कृष्ण दोन, गोविंद तीन, हरि चार–चार नावें झालीं, आणखीहि होतील. पण आपण ईश्वराची मोजदाद करायला गेलो आणि ईश्वराचें नांव मोजू लागलो. एक ईश्वर, दोन डोंगर, तीन झाड, चार नदी, तर तसें मोजता येणार नाही. म्हणून अद्वितीयचा अर्थ असा, एक ईश्वर मोजला की बाकी सगळेत्याच्या पोटात येतात. आपण असें मोजू शकत नाही की एक हिंदुस्थान, दोन पवनार, तीन नागपूर. हे हिंदुस्थानच्या पोटात येतात. तसेंच हें झाड, ही नदी, डोंगर, माणसें पशु-पक्षी सगळें ईश्वराच्या पोटात येतात. म्हणून ईश्वराचें एक नांव घेतलें, की दुसरें नाव मोजायला उरतच नाही. मोजायचें असेल तर ईश्वराला बाजूला ठेवा आणि मग मोजदाद करा. एक, दहा, शंभर, हजार, लाख, कोटी, दहा कोटी मोजा, अब्ज मोजा, खर्व मोजा निखर्व मोजा. पण ईश्वराचे नांव घेतलें, तर एक ईश्वर आणि दोन कोणी नाही. हेंच ज्ञानदेवांनीं सांगितलें-'तर एक नांव हरि, द्वैत नांव न उरी' तर अद्वितीयचा अर्थ काय झाला ?

# श्रीगोंदवलेकर महाराजांच्या हितोपदेशाच्या गोष्टी

## चांगलें-वाईट शेवटीं ठरतें

एका गांवामध्यें एक मनुष्य व्यापार करीत असे. व्यापार साधाच होता. त्यामुळें त्याला भांडवल पण फार लागत नव्हतें. कांहीं दिवस सुरळीत चालल्यावर त्याला दरवर्षी बूड येऊं लागली. त्याचा मामा मोठा सावकार असून एका दूरच्या गांवीं राहात होता. या माणसानें मामाकडे जाऊन शंभर रुपये उसने आणले. त्यावर कांहीं दिवस व्यापार चालला, परंतु पुनः फार मोठें नुकसान झालें आणि त्याला आपलें घरदार विकावें लागलें. गांवामध्यें आतां राहण्यांत शोभा नाहीं असें ठरवून तो व त्याची बायको गांव सोडून निघाले. जातां जातां वाटेमध्यें एक लहानसें गांव लागलें. तेथें लहानसें पण चांगलें असें एक मारुतीचें मंदिर होतें. त्यामध्यें तीं दोघेजण राहूं लागलीं. नवऱ्यानें भिक्षा मागून आणावी, दोघांनीं तें अन्न खावें आणि भजनपूजनांत वेळ घालवावा असा क्रम चालला. याप्रमाणें दोनतीन वर्षें मोठ्या आनंदांत गेलीं. एक दिवस त्या सावकाराचा मनुष्य गांवामध्यें आला. त्याला बघितल्याबरोबर बाईच्या पोटांत धस्स झालें. आपण मामाचे शंभर रुपये देणें लागतों, ते मागण्यासाठीं तो आला आहे अशी दोघांची कल्पना झाली, पण तो मनुष्य म्हणाला, "तुमचा मामा फार थकला असून सध्यां मृत्युशय्येवर पडला आहे. तुम्हांला काहीं द्यावें असें त्याच्या मनांत आहे. म्हणून तुम्हांला मी घेऊन जाण्यास आलों आहें." हें ऐकून नवराबायकोचा जीव भांड्यांत पडला आणि दोघेजण त्या माणसाच्या बरोबर मामाकडे गेले. त्याची भेट झाल्यावर मामा म्हणाला, "अरे. तुझा मी कितीतरी शोध केला ! मला तुझ्याशिवाय कोणी नाहीं हें तूं पाहतोस. माझी सर्व संपत्ति तूं घे आणि माझ्या घरांत राहा. माझ्यामागें दिवा लागावा येवढीच

माझी इच्छा आहे." सावकारानें भाच्याच्या नांवानें सर्व संपत्तीचें बक्षीसपत्र करून दिलें आणि चारआठ दिवसांनीं तो मरून गेला. अचानक रीतीनें इतकी संपत्ति मिळाल्याबरोबर या माणसाचें डोकें ताळ्यावर राहिलें नाहीं आणि लवकरच तो व्यसनी बनला. कांहीं दिवसांनीं त्याचें व्यसन इतक्या थराला पोंचलें कीं, तो आठआठ दिवस घरीं येईनासा झाला. ही परिस्थिति पाहून त्या बाईच्या डोळ्याला सारखें पाणी येई आणि ती म्हणे, "मारुतिराया! अरे तुझ्या पायापाशीं अत्यंत गरीबीमध्यें आम्ही किती सुखी होतों! पण तूं हा पैसा दिलास. हा वर न ठरतां शाप ठरला."

तात्पर्य—कोणतीहि गोष्ट घडली कीं, ळगेच तिचें सुख किंवा दुःख करूं नये. होणारी गोष्ट चांगली का वाईट हें शेवटीं तिच्या परिणामावरून ठरत असतें. म्हणून गोष्ट घडली कीं, एकदम हुरळून जाऊं नये. अशी वृत्ति राहण्यास भगवंताच्या कर्तेपणाची आठवण ठेवावी.

### कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे :

पंढरपूरहून ५० मैल दूर असलेल्या एका गांवीं एक मनुष्य राहात असे. दर वर्षी पंढरीला चालत जाण्याचा त्याचा नियम होता आणि तो नियम त्यानें ५० वर्षे अगदीं कधीं न चुकतां चालविला. म्हातारपणामुळें अलीकडे चालत जाण्याचा त्याला त्रास होई. तरी तो पांडुरंगाच्या दर्शनाला गेल्यावांचून राहायचा नाहीं. एका वर्षी तो आजारी असल्यानें फार अशक्त झाला आणि वारीला चालत जाणें अशक्य झालें. इतकी अवस्था झाली तरी पायांना फडकीं बांधून व हातांत काठी घेऊन म्हातारा चालत निघाला. त्याच्या मुलांनीं पुष्कळ सांगून पाहिलें पण त्यानें ऐकलें नाहीं. शेवटीं एक मुलगा त्यांच्याबरोबर चालत निघाला. दहापंधरा मैल चालल्यावर म्हाताऱ्याला पुढें पाऊल टाकणें अशक्य झालें आणि तो बेशुद्ध पडला. त्याच्या डोक्यावर पाणी वगैरे मारून त्याला शुद्धीवर आणला; त्या वेळीं तो इतका प्रसन्न दिसला कीं, मुलानें त्याचें कारण विचारलें. म्हातारा म्हणाला, "बेटा! माझी वारी पूर्ण झाली. मला पांडुरंगानें दर्शन दिलें व परत घरीं जाण्यास सांगितलें. चल, आपण आतां घरीं जाऊं!" घरीं आल्यावर तीनचार दिवसांतच त्यानें देह ठेवला.

तात्पर्य—भगवंताच्या बाबतींत जो निश्चय करील त्याला तो दूर नाहीं. साधकाच्या अंगीं थोडेंसें धाडस पाहिजे. त्यानें थोडेंसें देहावर उदार झालें

पाहिजे; म्हणजे भगवंत त्याला दर्शन देतो. आपली जेवढी शक्ति असेल तेवढी सगळी वापरून आपलें कर्तव्य करावें आणि जेथें आपलें कर्तेपण संपतें तेथें त्याला हांक मारावी. किंबहुना हांक मारण्याच्या आधींच भगवंत येतो.

## निश्चयाचें बळ :

मंडलेश्वर नांवाच्या गांवामध्यें एक प्रसिद्ध गांवगुंड होता. त्याचें वय ५६ वर्षांचें असून त्यानें पेन्शन घेतलेलें होतें. गांवामध्यें कोणी राजकीय पुढारी किंवा हरिदास किंवा साधु आले म्हणजे चार चौघांसमोर त्याला आडवेतिडवे प्रश्न विचारून त्याची फजिती करून टाकायची यामध्यें त्याचा हातखंडा होता. एकदां एक मोठा साधु त्या गांवीं आला. रामाच्या मंदिरामध्यें संध्याकाळीं पुष्कळ मंडळी जमली आणि साधूचें ईश्वरभक्तीवर निरूपण सुरू झालें. निरूपण ऐन रंगांत आलें असतां हा गुंड एकदम उभा राहिला आणि म्हणाला, "अहो साधुमहाराज ! हीं तुमची भक्तिबिक्ती बाजूला राहूं द्या. पण हिंदुस्थानला स्वराज्य केव्हां मिळतें तें सांगा." साधूहि कांहीं कमी नव्हता. तो म्हणाला, "तें सांगतों. पण तुम्ही स्वतःबद्दल कांहीं विचार केला आहे काय ? तुमचें आतां वय झालें. काळ केव्हां झडप घालील याचा नेम नाहीं. तुम्ही स्वतःचें स्वराज्य साधून घ्या. देशाचें भगवंत पाहून घेईल." आजपर्यंत त्यानें पुष्कळ लोकांची हबेलंडी उडविली होती खरी, पण साधु मात्र त्याला खरा पक्का भेटला. साधूचा तो उलट मार्मिक प्रश्न ऐकून गांवगुंड चूपच बसला. निरूपण आटोपल्यावर सर्व मंडळी घरीं गेली. याला रात्रभर चैन पडलें नाहीं. तो सकाळीं लवकर उठला व स्नान वगैरे करून साधूच्या दर्शनास गेला. त्यानें साधूला सांगितलें कीं, "आजपर्यंत मी स्वतःचा विचार केलाच नाहीं. आतां मी काय करूं तें आपण सांगा" साधु म्हणाला "तूं दोन वर्षें मौन धर आणि नामस्मरण कर. काय चमत्कार होतो तो पहा ! "झालें, त्या दिवसापासून त्या माणसानें मौन धरलें आणि जपाचा तडाखा लावला. दोन वर्षं त्यानें मौन पाळलें. नंतर चार वर्षांनीं तो साधु पुनः तेथें आला. साधु आले हे कळल्याबरोबर तो गेला आणि त्यानें साष्टांग नमस्कार घातला. साधूनें विचारलें, "काय रे ! आतां काय म्हणणें आहे ? "हें ऐकून त्याच्या डोळ्यात पाणी आलें व तो म्हणाला, "महाराज ! मला सर्व मिळालें. अशीं स्वराज्यें आलीं आणि गेलीं तरी मला जें मिळालें तें नामानें मिळालें. धन्य आहे भगवंताचें नाम !" गांवांतील सर्वांना त्यानें साधूचें दर्शन करविलें. पुढें

तो दोनचार वर्षे जगला, पण त्यानें आपला काळ नामस्मरणांत घालविला आणि धन्य होऊन गेला.

तात्पर्यः—भगवंतानें माणसाला निश्चय करण्याची शक्ति दिली आहे. तिच्या जोरावर तो वाटेल तें ध्येय साध्य करून घेऊं शकतो. म्हणून भगवंताच्या नामाशिवाय आपण राहणारच नाहीं, असा निश्चय केला तर वाटेल त्या वयामध्यें भगवंताची कृपा संपादन करतां येईल. हें साधेल, तर नामानेंच साधेल. एकदां नामाची चटक लागली कीं, मनुष्य नाम सोडणार नाहीं. नामांत फार आनंद आहे.

## हा खरा त्याग

एका गांवाच्या आसपास एक गृहस्थ राहत असे. दिसण्यांत गोरापान व मोठा सुरेख असून तो बालब्रह्मचारी असल्यानें त्याच्या शरीरावर मोठी कांति दिसे. त्याचप्रमाणें अत्यंत मनापासून भगवंताची उपासना केल्यामुळें त्याच्या डोळ्यांमध्यें एक प्रकारचें तेज होतें. गांवामध्यें तो भिक्षा मागायला जाई. एका घरीं त्याला भिक्षा चांगली मिळे. एकादां तो ध्यानास बसला असतां कांहीं केल्या त्यांचें ध्यान जमेना. दोन तीन दिवस उपवास करून त्यानें ध्यानस्थ होण्याचा प्रयत्न केला तरी त्याचें ध्यान पूर्वीप्रमाणें ठरेना. शेवटीं चौथ्या दिवशीं उपवासानें फार क्षीणता आल्यानें थोडें अन्न खावें. म्हणून तो भिक्षेला निघाला. ज्या घरीं चांगली भिक्षा मिळे, तेथें जाऊन तो उभा राहिला. तेव्हां घरांतील बाई भिक्षा घेऊन बाहेर आली आणि भिक्षा त्याच्या झोळींत टाकतां टाकतां म्हणाली, "दोनतीन दिवस तुम्ही कां आला नाहीं! मी तुमची सारखी वाट पाहात होतें. तुमचे डोळे किती सुंदर आहेत!" साधूनें भिक्षा घेतली खरी, पण त्या बाईचे शब्द ऐकून त्याच्या अंतःकरणात प्रकाश पडला. तो स्वतःशींच म्हणाला, "माझे डोळे त्या बाईला आवडले. ती माझें सारखें चिंतन करीत होती. त्यामुळें माझ्या ध्यानामध्यें सारखा व्यत्यय येत होता. या सुंदर डोळ्यांनीं मला रामापासून दूर केलें. नाहीं का! मग हे ठेवून काय करायचे आहेत?" असा विचार करून त्यानें आपलीं नखें डोळ्यांमध्यें खुपसलीं, डोळे म्हणजे मांसाचे गोळे ते बाहेर काढले, एका फडक्यांत घेतले आणि काठी टेकीत टेकीत त्या बाईच्या. घरीं आला. त्यानें मोठ्यानें बाईला हांक मारली. बाई बाहेर येऊन

पाहते तों हा प्रकार. साधु तिला म्हणाला, “ बाई ! माझे डोळे तुम्हांला फार आवडले ना ! हे घ्या माझे डोळे. ” असें म्हणून त्यानें तें फडकें तिच्यापुढें ठेवलें आणि आपण तेथून कायमचा निघून गेला.

तात्पर्य—ज्याला भगवंताच्या अनुसंधानाची खरी किंमत कळली त्याला जगांतील वस्तु कःपदार्थ वाटतात. इतकेंच नव्हे, तर हा देह देखील भगवंताच्या आड येऊं लागला तर त्याचा त्याग करण्यास तो एका पायावर तयार असतो. भगवंतासमोर या त्रिभुवनामधील कोणतीहि वस्तु तुच्छ वाटणें हेंच खरें वैराग्याचें लक्षण आहे. म्हणून आपण आपल्या मनाला नेहमीं जगाचें अशाश्वतपण पटवीत असावें. तें जर खरोखर पटलें तर आपण त्याच्या मागें जाणार नाहीं. जग सत्य वाटतें म्हणून आपलें प्रेम त्याच्यावर बसतें. तें असत्य आहे असें मनापासून वाटूं द्या म्हणजे मग भगवंतावर, सद्वस्तूवर प्रेम करा असें सांगण्याचें कारण नाहीं. तें आपआप घडेल.

## कर्तव्याचें तेज

एका गांवामध्यें एक पाटील राहत होता. त्याचा बाप चांगला लोकप्रिय असल्यानें त्याचें कुटुंब सर्वांना माहीत होतें. शिवाय, घरची शेतीवाडी पुष्कळ असल्यामुळें घरामध्यें कांहीं कमी नव्हतें. पाटलाचें लग्न लहानपणींच झालें आणि खरोखर कुलशीलवान, सुंदर व सात्त्विक मुलगी त्याला बायको म्हणून मिळाली. मुलीच्या बापानें आपल्या अंतकाळीं तिला एकच गोष्ट सांगितली. ती ही कीं, “मी तुला पाटीलबाबांच्या पदरांत टाकली आहे. त्यांची सेवा करणें हेंच तुझें कर्तव्य आहे. ते कसेहि वागले तरी त्यांचे दोष पाहूं नकोस. पांडुरंगाचें नाम घे आणि त्यांची सेवा कर. यांनेंच तुझें कल्याण होईल.” वयांत आल्यावर पाटील वाईट संगतीला लागला आणि एका बाईच्या फंदांत पडला. रोज रात्रीं तो बाहेर जायचा आणि त्या बाईकडेच राहायचा. कांहीं दिवस गेले. त्याची बायको अत्यंत सात्त्विकपणें वागे. तिनें त्याला कधींहि दुखविलें नाहीं व आपली उपासना सोडली नाहीं. एक दिवस पाटील संध्याकाळीं शेतावरून घरीं परत येत होता. वाटेमध्यें त्याच्या पायामध्यें खिळा गेला. त्यानें खिळा काढून टाकला, पण त्यामुळें बरेंच रक्त जाऊन थोडी जखम झाली. घरीं आल्यावर बायकोनें त्याच्या पायाला पट्टी बांधली. आणि तो लंगडत असल्यामुळें त्याला

नेऊन निजविलें. अंथरुणावर पडून बराच वेळ झाला तरी त्याला झोप लागेना. तो सारखा कण्हूं लागला, त्याला चैन पडेना. तेव्हां बायको म्हणाली, "आपल्याला काय होतें आहे ? पाय फार दुखतो का ? दुखत असला तर मी शेकून देतें." पाटलानें सांगितलें, "पाय दुखतो त्याचें मला फारसें वाटत नाहीं, पण मला तिच्याकडे जातां येत नाहीं याचें फार वाईट वाटतें" हें ऐकून बायको म्हणाली, "एवढेंच ना ! आपण माझ्या पाठीबर बसा. मी आपल्याला तिच्याकडे घेऊन जाते." त्या बाईनें नवऱ्याला पाठुंगळीं घेतलें आणि दोघेजण निघाले. अर्ध्यावाटेवर गेल्यावर पाटलाला काय वाटलें कोणास ठाऊक पण तो खालीं उतरला. आपल्या बायकोच्या पायां पडला आणि मोठ्यानें रडूं लागला. तो म्हणाला, "मी केवडा पापी आहे ! आज पर्यंत मी शेण खाल्लेंलें, तुला इतकें दुखवलें, पण तूं मात्र माझ्याशीं खरी चांगली वागलीस. आतां घरीं चल. माझे डोळे उघडले." त्या दिवसापासून पाटील अगदीं निराळा माणूस बनला.

तात्पर्य—संत सांगतात कीं एकांत समाधान आहे. जगामध्यें तर अनेकता भरलेली आहे. मग समाधान कसें पावायचें ? याला सोपा मार्ग म्हणजे आपण आपलें कर्तव्य करावें. दुसरा कसाहि का वागेना ! आपण आपलें कर्तव्य योग्य रीतीनें केलें तर आज ना उद्यां त्याचें तेज पडल्याशिवाय राहात नाहीं. मोबदला काय मिळेल हा विचारच करूं नये. जगांत मी व भगवंत एवढेच आहेत असें म्हणावें. त्यांपैकीं मी देखील कर्तव्यापुरताच आहें. म्हणजे शेवटीं भगवंत एकटाच शिल्लक उरतो. म्हणून कर्तव्यांत समाधान मिळतें. पण कर्तव्य योग्य प्रकारें घडण्यास भगवंताचें अनुसंधान अवश्य आहे.

## थोडा नियम काम करतो.

एका शहरामध्यें एक मोठा व्यापारी असे. तो व्यापारामध्येंच पुढें होता असें नव्हे तर गांवांतील अनेक संस्थांशीं त्याचा संबंध असल्यामुळें आणि तो उदारपणानें पैसा खर्च करीत असल्यानें सर्व लोकांचें त्याच्यावर मोठें प्रेम असे. एकदां त्या शहरामध्यें एक मोठा साधु आला. सर्व लोक दर्शनाला आले आणि हा व्यापारी देखील आला. त्याला पाहून साधु सहज म्हणाला, "आपण आपलें जीवन फार उत्तम रीतीनें घालवितां यांत शंका नाहीं, पण त्यामध्यें भगवंताचें स्मरण जर ठेवाल तर दुधांत साखर पडल्याप्रमाणें होईल. राम आपलें कल्याण

करील." हें ऐकून व्यापारी म्हणाला, "महाराज! आपण सांगतां तें अगदी योग्य आहे. मला देखील नामस्मरण करावें असें वाटतें, पण सकाळीं उठल्यापासून रात्रीं अंथरुणावर पडेपर्यंत मला एक मिनिट फुरसत नाहीं. दिवसभर काम करून मी इतका थकून जातों कीं, अंथरुणावर पडल्याबरोबर मला झोप लागून जाते. मग आपणच सांगा मी, नाम केव्हां घेऊं? साधु म्हणाला, "तुमचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. पण रोज तुम्ही सकाळीं स्नान करतां डोक्यावर पाण्याचा पहिला तांब्या घेतल्यापासून अंग पुसून धोतर नेसेपर्यंत तुम्ही तुमच्या व्यापाराचें किंवा लोकांचें काय काम करतां?" व्यापारी म्हणाला "नाहीं बुवा! त्या वेळी मी दुसरें कांहीं करीत नाहीं, हें खरें आहे." साधु बोलला, "हें जर खरें, तर त्यावेळीं तुम्हांस नाम घेण्यास सांगितलें असतां तुम्ही नाम घ्याल का?" व्यापाऱ्यानें स्पष्ट सांगितलें कीं, "होय, त्या वेळीं मी जरूर नाम घेईन." यावर साधु म्हणाला, "ठीक आहे., मग स्नानाला बसून पाण्याचा पहिला तांब्या डोक्यावर घेतला कीं, विष्णु सहस्रनाम म्हणायला सुरवात करायची आणि अंग पुसून धोतर नेसणें होईपर्यंत तें संपवावयाचें असा नियम उद्यांपासून तुम्ही करा. माझा आशीर्वाद आहे. राम तुमचा अंतकाल फार गोड करील. व्यापारी अत्यंत प्रामाणिक होता. त्यानें अगदीं दुसऱ्या दिवसापासून स्नानास आरंभ करण्याच्या वेळीं विष्णुसहस्रनाम म्हणण्यास सुरवात केली. तें सबंध म्हणण्यास त्याला पंधरा मिनिटें लागत. दहा बारा वर्षें याप्रमाणें गेली. त्याचा हा नियम अगदीं अखंड व बिनबोभाटपणें चालू राहिला. पुढें त्याला मेंदूचा आजार झाला. त्याचें भयंकर डोकें दुखे, इतकें कीं तें दुखूं लागलें म्हणजे डोकें आपटून प्राण द्यावा असें त्याला होई. जवळ पैसा होता व लोकांची मदत होती म्हणून जेवढे उपाय शक्य होते तेवढे सगळे करून झाले, पण त्याला यत्किंचित गुण आला नाहीं. त्याचा आजार वाढतच गेला आणि एक दिवस तो बेशुद्ध झाला. त्याची आशा सोडून सर्वजण मरणाची वाट पहात बसले होते. इतक्यांत रस्त्यामधून एक वैदू ओरडत चालला होता कीं, "डोकें दुखीला औषध आहे." एकानें त्याला घरांत बोलावून हा बेशुद्ध रोगी दाखवला. वैदू म्हणाला, "माझ्यापाशीं एक मुळी आहे. ती पाण्यामध्यें उकळून तें पाणी डोक्यावर ओतलें म्हणजे रोगी बरा होतो. पण मुळीं फार जहाल आहे. रोगी बरा तरी होईल किंवा दगावेल तरी, म्हणून तुम्ही विचार

करा." व्यापाऱ्याचा मुलगा म्हणाला, नाहींतरी आतां सर्व उपाय थकले आहेत. हा उपाय करून पाहूं. चांगला परिणाम झाला तर बरेंच झालें." त्याप्रमाणें वैद्यच्या मुळ्या पाण्यांत उकळल्या, रोग्याला खोलींतच मोरीवर बसविलें आणि त्याच्या डोक्यार पाण्याचा तांब्या ओतला. डोक्यावर पाणी पडलें मात्र आश्चर्याची गोष्ट अशी कीं, बेशुद्धीमध्यें असलेला तो व्यापारी एकदम शुद्धीवर येऊन "विश्व विष्णुर्वषट्कारो" असें विष्णुसहस्रनाम धडाधड म्हणूं लागला. हें सर्व त्यानें स्पष्टपणें म्हटलें आणि सर्वांना नमस्कार करून प्राण सोडला.

तात्पर्य—परमार्थामध्यें फार करावें लागत नाहीं. थोडेंच पण प्रामाणिकपणें आणि चिकाटीनें करावें लागतें. गीतेमध्यें भगवान सांगतात कीं, "अंतकाळीं जो माझें नाम घेतो त्याचा मी उद्धार करतों" हें जर खरें तर एवढ्या थोड्या नियमानें व्यापाऱ्याचा उद्धार झालाच पाहिजे यांत शंका नाहीं. आपण प्रापंचिक माणसें आहोंत. आपण नियम अगदीं थोडाच करावा, पण तो प्राणाबरोबर सांभाळावा. नियम कसा असावा, जेवायला बसतांना पहिला घास घ्यायच्या आधीं दहा वेळा नाम घ्यावें, किंवा निजण्यासाठीं अंथरुणावर पडलें कीं भगवंताची मूर्ति डोळ्यांसमोर आणून त्याच्या पायांवर मस्तक ठेवून निजावें, किंवा सकाळीं उठल्याबरोबर अंथरुणांतून बाहेर पडायच्या अगोदर "भगवंता ! तुझ्या कृपेनें आजचा दिवस उजाडला आहे, तुझ्या स्मरणांत जाऊं दे." अशी प्रार्थना करावी. थोड्या नियमानें फार मोठें काम होतें. नाहींतर प्रत्येक काम सुरू करतांना 'राम' म्हणावें व तें झालें, कीं 'कृष्णार्पण' म्हणावें. हा तर सर्व नियमांचा राजा आहे.

## देवाला अर्पण

एका गांवामध्यें एक मोठा साधु राहत असे. तेथें येणाऱ्या लोकांना तो सन्मार्गाला लावी आणि उपदेश करी. असा उपदेश करतांना साधु एकदां म्हणाला, "आपलें जें जें आहे तें तें भगवंताला अर्पण करावें. त्याच्यामध्यें मनाला शांति मिळते." साधूची एक शिष्यी होती. त्याप्रमाणें तिनें आपला मुलगा साधूला अर्पण केला. साधूनें पण तो घेतला. अगदीं स्वतःच्या मुलाप्रमाणें त्या मुलाचें सर्व कांहीं तो साधु करूं लागला. मुलाला आठवें वर्ष लागल्यावर त्याची मुंज करावयाची ठरवून साधूनें मोठा समारंभ केला. पुष्कळ मंडळी पानसुपारीला आली, अन्नदान पुष्कळ झालें.

आणि भिक्षावळ देखील चांगली आली. सर्व लोक आनंदांत होते .इतक्यांत मुलाची आई रडूं लागली. सगळ्यांना आश्चर्य वाटलें. ही बातमी साधूपर्यंत पोंचली, तेव्हां त्यानें रडण्याचें कारण बाईला विचारलें. बाईनें सांगितलें की, "महाराज! माझ्या मुलाची एवढी मुंज आपण केली खरी, पण आपण त्याला हांसळी केली नाहीं." बाईचें बोलणें ऐकून साधूला हसूं येऊं लागलें. तो म्हणाला, "बाई! तुम्ही असें कसें विचारतां ? तुम्हीं मुलगा मला अर्पण केला तेव्हांपासूनच तो माझा झाला. जर तो मुलगा माझा तर त्याला हांसळी नाहीं म्हणून तुम्ही कां रडतां, मी पाहिजे तर रडेन ! " आजूबाजूची मंडळी हसूं लागली.

तात्पर्य—आपण एकादी वस्तु देवाला अर्पण केली तर ती सुखरूप राहावी म्हणून अर्पण करतों, किंवा आपलें नांव व्हावें म्हणून अर्पण करतों, किंवा आपलें पाप कमी व्हावें म्हणून अर्पण करतों. हें कांहीं खरें नव्हे. देवाला काय कमी आहे म्हणून आपण त्याला द्यावें ? आपली आसक्ति, आपला माझेपणा आपला लोभ कमी व्हावा म्हणून आपण देवाला अर्पण करायचें असतें. हें समजून अर्पण केलें नाहीं तर वस्तु तर जातेच आणि फायदा मात्र कांहीं होत नाहीं. देवानेंच दिलेलें आपण त्याला परत देतों. ही भावना अर्पण करणाऱ्यांत असावी.

## "मला सर्व धर्म सारखे"

एकदां एक सुशिक्षित बाई एका साधूच्या दर्शनास गेली. बाई मोठी हुषार व बोलकी होती, साधु सहज म्हणाला, "बाई ! तुम्ही इतक्या परीक्षा पास झालां त्या पास करण्यासाठीं पुष्कळ पुस्तकें वाचावी लागली असतील नाहीं का ? " बाई म्हणाली, "होय तर ! पुष्कळ पुस्तकें वाचावी लागली आणि तीं निरनिराळ्या भाषांमध्यें, म्हणजे इंग्रजी, मराठी व संस्कृत या भाषांमध्यें वाचावी लागली साधूनें विचारलें, "मग तुम्हीं भगवद्गीता वाचली आहे का ? बाईनें उत्तर दिलें, "हो, हो तर ! माझ्या एम्. ए. च्या परीक्षेलाच भगवद्गीता होती. साधु म्हणाला, "मग श्रीकृष्णाच्या उपदेशाप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करावा. आपल्या धर्मामध्यें गीतेसारखा ग्रंथ नाहीं. त्याचें आचरण जो करील त्याला भगवंत भेटेल. साधूचें हें बोलणें ऐकून बाई फणकाऱ्यानें म्हणाली, "अहो, तुम्ही श्रीकृष्णाला आणि

त्याच्या गीतेला एवढें महत्त्व कां देतां? मला तर सर्व धर्म एकसारखेच वाटतात. नंतर इकडच्या तिकडच्या थोड्या गप्पा झाल्यावर तिनें विचारलें, "महाराज! माझी मुलगी लग्नाची आहे. अजून तिचें कोठें जुळत नाहीं. तिचें कसें होईल याची मला काळजी वाटते. तिचें लग्न कसें होईल तें सांगा. साधूहि कांही कच्चा नव्हता. तो म्हणाला, "बाई! ज्या बाईला सर्व धर्म सारखे वाटतात तिच्या मुलीचें इतर मुलीसारखेंच होईल. तेथें काळजीचें कारण कोठें आहे? हें उत्तर ऐकून बाई विरमली आणि गप्प बसली,

तात्पर्य—आपल्या सोयीप्रमाणें आपण माझेपणा ठेवतों व काढतों. गीता ही जगाला मान्य आहे. तिचें आचरण जो करील तो सर्व जगावर प्रेम करील. त्याला खरोखर सर्व धर्म एका परमेश्वराचे आहेत असें मनापासून वाटेल. अशी अवस्था येईपर्यंत ज्या धर्मामध्यें आपण जन्माला आलों. त्याच प्रमाणें आचरण ठेवावें. त्यानेंच आपली चित्तशुद्धि घडेल आति भगवंताचे प्रेम उत्पन्न होईल.

---

# भूत, भविष्य आणि वर्तमान

जी गोष्ट किंवा घटना घडून गेली तिच्याबद्दल वृथा दुःखखेद करीत बसूं नका. झालें तें गेलें! मागें पडलें. तसेंच आतां यापुढें काय घडणार आहे त्याचीही चिंता करण्यांत वेळ व्यर्थ दवडूं नका. जें घडायचें असेल तें घडेल, तुम्हीं चिंता करून काय होणार आहे? आज ज्या काळांत तुम्हीं वावरत आहांत त्या काळाचा, प्रत्येक क्षणाक्षणाचा सदुपयोग कशारीतीनें करतां येईल याची जरूर चिंता वहा. आजचा काळ, साहस, उत्साह, श्रद्धा, चिकाटी व तत्परता वगैरे गुणांच्या बळावर कल्याणदायक कसा बनवितां येईल तें पहा त्यासाठीं मनापासून झटा. म्हणजे मग तुमचा भविष्यकाळ आपोआप कल्याण कारी बनल्याशिवाय रहाणार नाहीं.

कोणीही असो. जो वर्तमान काळाची पर्वा न करतां व त्या काळांतील आपलें पवित्र कर्तव्य इमानेंइतबारें पालन न करतां भविष्य काळाचीं सुखस्वप्नें भोगण्यांत व गतकाळाबद्दल दुःख करण्यांत जो आपल्या उत्साहाचा नि वेळेचा अपव्यय करतो त्याच्या वाट्याला दुःखाशिवाय दुसरें कांहीं येणार नाहीं.

# चंद्रवीरास प्रणाम

मला न माहित कोण तुम्ही पण
जीव घुटमळे तुमच्या भवती
तुम्हा न कधि मी पाहिले परि
करुनि उभा नयनांच्या वाती ॥ १ ॥

तुम्हा न बघता तुमच्या तेजे
दिपले डोळे अंतरज्ञानी
तुम्ही वीर जे मानव भूषण
चंद्र पृथ्विचे अंतरज्ञानी ॥ २ ॥

काय वाहणे तव पदकमली
जन्मजन्मिच्या उदात्त वृत्ती
उफाळल्या या उत्तुंग समयी
शतजन्मीच्या जीवन भक्ती ॥ ३ ॥

धन्य जीवनी धन्य अमरपण
यज्ञकृती भुषवुन धर्माला
आहुति आहे ब्रह्मांडाची
पिंडब्रह्म तव नत वर्माला ॥ ४ ॥

उजाड जीवनि आशा तुमची
मानव जगेल भावी यशाला
विशाल विश्वी तुम्हीच भिडला
खरोखरी त्या प्रभु चंद्राला ॥ ५ ॥

— दादा दाभोलकर, वेंगुर्ला.

# मनांत आलं कीं----

( ले.:—द. शं. टिपणीस )

( फेब्रुवारी ६९ च्या अंकावरून चालू )

## ६२ जहागिरी व काळाबाजार

छत्रपती शिवाजीनें जहागिरी व वतनें देण्याची पद्धत बंद केली हें त्याच्या राज्यकारभाराचें एक वैशिष्टय आहे. शिवाजी जाणून होता कीं वतने व जहागिऱ्यांमुळें मालकी हक्क व तोही वंशपरंपरागत निर्माण होतो. यामुळें राष्ट्रवाढीपेक्षां वतन वाढीकडे अधिक लक्ष लागतें. मालकी हक्काची भावना मानवाच्या ठायीं उपजतच असते. जहागिरी व वतने यामुळें ही भावना पोसली जाते व स्वार्थ बळावतो. आपण सर्व श्रेष्ठ व्हावे इतरांची सत्ता मानूं नये, उलट त्यांच्यावर आपण सत्ता गाजवावी अशी वृत्ति होते. राष्ट्रहितापेक्षां स्वहित मोलाचें वाटतें. मग सरदार राजसत्तेला जुमनीनासे होतात. स्वार्थापायीं शत्रूस मिळून फंदफितूरीकरतात व राष्ट्रावर निखारे ठेवण्यास खुशाल तयार होतात. मराठ्यांच्या इतिहासानें हें सर्व उघड केलेलें आहे आणि म्हणून शिवाजीनें जहागिरी पद्धत बंद केली. शिवाजीची ही दूरदृष्टी स्वातंत्र्या-नंतर आपल्याकडे कोणी उचलली असेल तर ती सरदार वल्लभभाई पटेल यांनीं. भविष्य काळांत असला टजबुजा होऊं नये म्हणून त्यांनीं स्वातंत्र्य मिळाल्यावर संस्थाने नष्ट केली व इंग्रजांनी पेरलेलें दुहीचे एक बीज जाळून टाकलें. आजही सरकार नवीन जहागिरी व वतनें देत नाहीं. ही पद्धत नष्ट झाली खरी पण ती निराळ्यारूपांत पुन्हां अवतरली. जहागिरी व वतनाइतकेंच फाजील मालमत्ता व धनसंचय यामुळें वंशपरंपरागत मालकी हक्क निर्माण होणें हें अंतीं राष्ट्रहितास घातक आहे. वतनें गेलीं पण त्यांतील विषाचें बीज धन संचयाच्या रूपांत राहून गेलें. काळाबाजार म्हणजे एकाकडे मर्यादेबाहेर

धन संचय होऊं दिल्याचा परिणाम आहे. भारत स्वतंत्र नाहीं. त्याच्यावर जागतिक दडपणाप्रमाणें या आधुधिक वतनवाल्यांचेही दडपण आहे. दामकरी काम असें चाललें आहे. न्यायनीतीबरोबर मानवतेलाही मूठमाती मिळत आहे. यामुळें शिवाजीनें केलें त्याप्रमाणें या वतनदारांना राष्ट्रहितासाठीं आवर घालणें आज ना उद्यां अवश्यक होईल. यासाठीं शिवाजीची नीति व वल्लभभाईचा दूरदर्शीपणा यांचे अवलंबन आजच्या राष्ट्रीय नेत्यांनीं करणें जरूर नाहीं कां वाटत ?

## ६४ गर्दी व रिकामी जागा

वारा कसा उत्पन्न होतो ? शास्त्रज्ञ सांगतात कीं हवा तप्त झाली कीं हलकी होते व ती वर जाते. मूळ ठिकाणीं पोकळी निर्माण होते. ती भरून काढण्यासाठीं बाजूची हवा घूसूं लागते. या घुसणाऱ्या हवेला आपण वारा म्हणतों. हें झालें शास्त्रज्ञांचे म्हणणें. पण आपलें नेहमीचें सांगावयाचे म्हणजे असें; आगगाडींत गर्दी असते. माणसें उभी असतात. अगदीं खेटून. स्टेशन येते. एक जण उतरतो. जागा रिकामी होते म्हणजे पोकळी होते, लगेच खेटून उभ्यां पैकीं पाचसात ती जागा घेण्यासाठीं एकदम घुसतात, अशी जी हवेची घुसाघुसी तिला वारा म्हणतात. आपलें मत म्हणजे गर्दीतील 'सीट' आहे, कधीं रिकामी राहायची नाहीं, मन कधीं रिकामें राहूं शकत नाहीं, कोणी ना कोणी तरी त्याला व्यापून असते. कोण असतात ते ? विचार. मनांत पोकळी राहूं शकत नाहीं. तें कधींच विचाररहित नसतें. मग तें आपल्या ध्यानी येवो वा न येवो, विचार रहित झाले तर सोन्याहून पिवळे होईल, मुक्ती म्हणतात ती मिळेल, गर्दी रहित गाडी म्हणजे यार्डातील गाडी, धावती नव्हे, विचार रहित मन म्हणजे आत्मानंदातील मन. व्यवहारांत धावणारे नव्हे व्यवहारांत मन धावायचेच. धावत्या गाडी तील गर्दीप्रमाणें तें विचारांनी भरलेले असायचेच, एकादा विचार बाहेर गेला तर दुसरे विचार त्याची पोकळी भरून काढतात, आपल्या सीट भोंवती असलेली गर्दी घुसणार, त्यात चांगले असतील, वाईट असतील मनात घुसणारे विचार रही असेच चांगले असले तर भले. वाईट घुसले तर उद्धचप करतील म्हणून आपलें मन सदा चांगल्या विचारांनीं भरलेले राहील याची दक्षता घ्यावी. तें रिकामें राहूं देऊं नये; राहाणारच नाहीं मुळी, म्हणून घुसणाऱ्या गर्दीवर चांगले-

लक्ष ठेवावें, या साठी सत्संग, सद्ग्रथांचें वाचन, मनन, देवांचें नामस्मरण, स्वकर्तव्य, एकादे चांगलें कार्य यांत सदैव मनाला गुंतवून ठेवावें, आपण रिकामें बसूं नये, बसलो तर मनही रिकामें राहिल. मग कोणीसे म्हटलें आहे a vacant mind is Saitan's house असें होईल, रिकामे मन म्हणजे कुविचारांची वसाहत,

## ६५ शस्त्रक्रिया

विज्ञानाचे साहाय्य मिळाल्यामुळें माणूस पूर्वी इतका आतां भूकंप, अतिवृष्टी' महापूर, वादळे वगैरे नैसर्गिक आपत्तींना घाबरत नाही कीं त्यामुळे गोंधळून जात नाहीं. हें खरें असलें तरी निसर्गाचा कोप एकाएकी झाला तर तो थोडाफार गांगरतो, गोंधळतो व भीतिग्रस्त होतो. अशावेळीं काय हा निसर्ग, त्याला काळवेळ कांहीं समजत नाहीं, भलत्या वेळीं भलत्या गोष्टी करून बसतो असें दूषण आपण निसर्गास देतो. वास्तविक निसर्ग हा माणसाच्या भल्यासाठींच आहे. तोच माणसाला पोसतो व वाढवतो. माणसाला ज्याचा अभिमान तें विज्ञानही त्यानेच दिलें आहे. जसा काय उदार कर्ण. स्वतःचें कवच काढून तो तें विज्ञान रूपानें दान करीत आहे. निसर्ग करतो तें, मग तों भूकंप असो नाहीं तर अतिवृष्टी असो, माणसाच्या भल्यासाठींच करतो. कोयनेचा भूकंप झाला म्हणूनच ना त्या शास्त्राचें सखोल ज्ञान मिळविण्याचे प्रयत्न चालू झाले? त्यानें माणसाच्या ज्ञानाभिमानाला धक्का दिला. त्याचा कोतेपणा कोयनेने उघड केला. आपलें ज्ञान वाढवून निसर्गाशीं लढत देण्याची ईर्षा त्यानें मानवांत उत्पन्न केली. आईनें बाळाला जवळ घेतले व खाऊ घातले कीं त्याला आनंद वाटतो. किती किती छान आहे असें म्हणतो. पण त्याच आईनें डोळे वटारले कीं मुसमुसतो. आई वाईट म्हणतो. निसर्गानें धान्य फळे पुष्पे विपुल दिली कीं मानव आनंदित होतो. निसर्गातील सौंदर्य दिसते त्याला, ममता दिसते. पण जर वां पावसाने डोळे वटारले तर मानव भयभीत होतो. निसर्ग फसवा वाटतो जास्त झाला तरी तेंच. आई व निसर्ग रागावले तरी तो वरचा पापुदरा मुळांत बाळाच्या कल्याणाचीच इच्छा डॉक्टरने कापले तरी ते आपल्या भल्यासाठींच.

## ६६ संघर्ष

पण आई बाळावर कां रागवते ? त्यानें मर्यादा उल्लंघिली असते. नको तें करतो म्हणून. निसर्गाचा प्रकोप तेव्हांच होतो कीं जेव्हां निसर्गाची चक्रे फिरावी तशी फिरत नाहींत. निसर्गाचे घटक आपली जागा सोडून मर्यादा उल्लंघू पहातात. कोणी तरी मुळांत आपली जागा सोडून चळवळ करतो, मर्यादा सोडूं लागतो. त्याचे धक्के इतरांना बसून तेही स्वकर्तव्य पार पाडावे म्हणून वर्तू लागतात. परिणाम घटकाघटकांमध्यें विरोध संघर्ष निर्माण होतो. त्यांच्यांतील एकात्मता नाहींसी होते, गडबड, गोंधळ धमाल माजते, निसर्गाचा प्रकोप झाला असें आपण म्हणतो. जें कोण असे करतात त्यांना दोष देतो. पावसाला दोष देतो. नदील दोष देतो. अग्नि वारा यांना नावें ठेवतो. माणूस, समाज व राष्ट्र हा ही एक निसर्गाचा भाग आहे. जेव्हां कोणी एकादा स्वकर्तव्य सोडतो. समाज व राष्ट्रानें घालून दिलेल्या मर्यादा उल्लंघू लागतो तेव्हां समाजांतील वा राष्ट्रातील घटकामध्यें मानवा मानवात संघर्ष होतो. खुद्द माणसातही वासना भावना यांत संघर्ष सुरू होतो. माणूस समाज व राष्ट्रयांच्यातील एकामता भंग पावते. बसलेली घडी विसकटते. ती पुन्हा नीट करण्याच्या कार्यात नवीन घडण जडण होते. प्रगती पुढें सरकते. यामुळें निसर्गाचे प्रकोप वा माणसातील संघर्ष यानें भिऊन जाण्याचें कारण नाहीं. भविष्य काळाच्या नव्या युगांतल्या त्या नौबती आहेत. हें ओळखून सत्कर्मासाठीं जें जें जरूर तें सर्व करण्यास कंबरा कसणें यांतच मानवाचें सामर्थ्य आहे.

## ६७ गळायचेच

कलमी आंब्याचें डौलदार झाड तें. दरवर्षी भरपूर रसाळ आंबे मिळत त्यापासून. झाड कसें अगदी मोहरानें बहरून आलें आहे. इवल्याशा फुलांचा मंद सुहास मनाला धुंद करीत आहे. आशा वाटते, आतां भरपूर फळें येतील. रसाळ आम्यांची लूट होईल. कळ्या फुलें म्हणजे भावी जीवनाची आशा. त्या खुलतील फुलतील व लोकांना सुखवणाऱ्या फळांना जन्म देतील. आशेचें मांडे मालक मनांत खात असतो. कांहीं दिवस जातात. आशेनें झाडाकडे पाहातो तों मोहोर करपलेला गळून पडलेला. त्याची आशाहि करपून जाते. देवा कशाला या कळ्यांना फुलाना जन्मास घातलेस ? करपून जाण्यासाठी, जळून जाण्यासाठी,

गळून पडण्यासाठी ? बिचाऱ्या कळ्या ! थोडावेळ फुलल्या. जगाला आनंद दिला, सुवास दिला. जगानें आशा धरली. पण देवा, तूं एकदम मारून टाकलीसकीरे ती ! ज्ञानेशानें लोकाच्या तोंडी अमृताचे थेंब लावले त्या चवीने मोहित होऊन लोक ज्ञानेशाकडून अधिक अमृताची अपेक्षा करीत असताच त्याना अमृतप्त ठेवून जीवनवेलीवरील हें टवटवीत, कोमल शुभ्र मोहक फुल गळून पडले ! मराठी बोलीला साहित्याच्या प्रगणात थयाथय नाचायला लावून भाषेचे नाना विलास दाखविणाऱ्या गडकऱ्याकडून अधिक मोहक गुदगुल्याची लोक अपेक्षा करतात न करतात तोंच तें फुल पूर्णफळ धरण्या आधीच टपकन खाली पडले. शास्त्रीचे फुल फळ धरूं लागते न लागते तोंच, देवा, तूं ते खुडून टांकलेस ! या निर्दयपणात देवा तुला कसलें सुख मिळतें ? असा कसा देवा तूं पाषाण—पण नाहीं हें सगळं चुकलच, जग राहटीप्रमाणें आज ना उद्या, लौकर उशीरा हें होणारच, त्याला तूं काय करणारं ? त्यांत तुझा काय दोष ? उमलायचें, फुलायचे, आशा दाखवीत जगायचे व चटका लावून जीवनवेलीवरून गळायचे हा पराक्रमी जीवनाचा नियमच आहे कीं काय न कळे. यांतील एका फुलानें म्हटलें आहे कीं जगण्यासारखे जोंपर्यंत आहे तोंपर्यंत मरण्यांत मौज आहे. विद्युल्लता चकूकन चमकते व नाहींशी होते. त्यामुळें ती मोहक वाटते, कदाचित चटका चुटपुट लागण्यांत जीवनाच्या खुमारीचा आनंदही असेल किंवा थोडक्यांत गोडी. जास्त झालं तर पचणार नाहीं, असही असेल. काय तें देवा, तुला माहीत. आम्हाला एकच माहीत. जीवनाचा हा असला बेभरंवसा ओळखून आहों तोंपर्यंत होईल तितकें चांगलें करून स्वतःचें व लोकांचे कल्याण करीत रहावें. दुसरें काय आपल्या हातीं आहे ?

### ६८ तुला नाहीं मला नाहीं घाल—

कोठार धान्यानें भरलेले आहे. मालकानें कुलूप लावून ठेवलें आहे, स्वता खात नाहीं, दुसऱ्यास देत नाहीं कीं पेरीत नाहीं. वर्षानें कोठार उघडतो. पहातो तो सर्व धान्य खराब झालेलें, उंदीर घुशींनीं नासधूस केलेलें, किडलेलें. खाणार तरी कोण तें ? पेरलें तरी उगवणार कसें ? मालक म्हणतो कर्म माझें. रक्ताचें पाणी करून एवढें साठवलें अन् असें झालें. कर्म

म्हणते मला कां दोष ? उलट मी तुला भरपूर दिले. तुलाच कळले नाहीं कीं कोठार बंद करून ठेवूं नये म्हणून. त्यांतील कांही आपण खावे, कांही भुकेल्यांना द्यावे व कांही. पेरावें म्हणजे खराबी होत नाही व आहे त्याच्यांत भर पड़त राहते. जें स्थिर झालें तें कुजतें जें फिरते हालचाल करतें त्याची वाढ होते. पण मूर्खा, तुला कुठें हें समजायला ? कुलूप लावून स्वस्थ बसलास तूं आणि दोष देतोस मला. निसर्ग पहा सारखा देतोय. म्हणून वाढतोय जिवंत आहे. तो सांगतो, मी तुम्हाला फुले फळे देतो, कांही धरणीमातेला अर्पण करतो फुलांतील मध कीटकांना चाखूं देतो. कोणी तोडला तर तोडूं देतो. यामुळें मी नाना रूपांत पुन्हां पुन्हां प्रगट होतो. माझी सारखी वाढ व भर भराट होते. माझ्याजवळ कांही ठेवत नाही. आहे ते धरणीमातेला व पित्याला ( आकाश ) अर्पण करतो. तो वर्षाव करून मला चौपट देतो. मी देतो म्हणून सुकतो खरा पण पुन्हा चौपट फोफावतो. देण्यात भरभराट आहे. नुसतें जोमाळण्यात मरण आहे ज्ञान, धन व सामर्थ्य असेंच आहे. भारंभार ज्ञान नुसतें कोठारात साठवून उपयोग काय ? तें वापरलें पाहिजे, इतरांना दिलें पाहिजे, नवीन ज्ञान मिळविण्यासाठीं त्याचा उपयोग केला पाहिजे. म्हणजे ज्ञान वृक्ष होईल. धनानें नुसती बँक भरून काय उपयोग ? आपल्या सुखासाठीं वापरावें, इतरांच्या कल्याणासाठीं लावावे व कांहीं पेरावें म्हणजे धनाची वाढ होईल. सामर्थ्य स्वतःपाशीं नुसते बाळगून काय फायदा ? म्हातारपणीं तो साठा आटून जाईल. समाजराष्ट्रासाठी वेळीच उपयोग करा. निसर्ग सांगतो, वापरा, दुसऱ्यांनी दिलेलें घ्या म्हणजे प्रगतीची गाडी चालती राहील. निसर्ग देतो घेतो म्हणून डौलानें डोलतो.

## ६०. कुत्र्याचें शेपूट.

कुत्र्याची शेंपटी नळीत घातली तरी वाकडी, सरळ शेंपटीचा कुत्रा मिळणें नाहीं व शेंपटी नळीत घातली तरी सरळ होणें नाहीं. कुठेंना कुठें वाकडी असायचीच. शिवाय लांगूनचालन कायकायसें तें करण्याची तिला भारी हौस. अन्नासाठी लाचारी, भुकेपोटीही लाचारीने बिचारे कुत्रे ! देवाने भूक दिली पण स्वतंत्र कमावण्याची अक्कल दिली नाहीं. मग दयावंत मायबाप म्हणण्या खेरीज तें बिचारें काय करूं शकणार ? वाकडे शेपूट व पोटासाठी लाचारी ही त्याला

मिळालेली देणगी, कशाला बिचाऱ्याला दोष द्या व त्याची निंदा करा, पण माणूस जेव्हां कुत्र्याप्रमाणें वागतो तेव्हां त्या कर्माला काय म्हणावें ? माणसाचें मन कुत्र्याच्या शेपटीप्रमाणें आहे, सदा वाकडे, कितीही शिकवा, सरळ करा, त्याची चाल वाकडी, थोडीथोडकी का नररत्ने वा विभूती होऊन गेल्या ? ईश्वराचे देहा अवतार झाले, सर्वांनीं शिकवण दिली, मार्ग दाखविले. पण मानवी मनानें वाकडी चाल टाकली नाहीं ती नाहींच. अन्नासाठी लाचारी चालूच आहे, देवानें दिलय पण आळसानें खाल्लय, पोटासाठी कांहींही करायला त्याला दिक्कत वाटत नाही. कुत्र्याप्रमाणें दोन्ही भुका भागविण्यासाठी वाटेल तिथें भटकतो व मागेपुढें न पाहतां वाटेल तें करतों आतां बोल माणूस व कुत्रा यांत काय फरक राहिला ? नशीब एवढेच की अस्सल कुत्र्याप्रमाणें अस्सल नररत्ने अधूनमधून जन्मास येतात, म्हणून जग टिकून आहे.

## ७० राजा व सेवक

उत्तम लौकीक असलेली, नाट्यकलेची उपासना करणारी ती एक नाट्यसंस्था. प्रेक्षकांना आकर्षित करण्यांत, उत्तमोत्तम नाटकें उत्कृष्ट रीतीनें सादर करण्यात तिचा हातखंडा. त्या संस्थेचें तें नाटक. राजदरबारचा सीन. राजा सिंहासनावर व प्रधान मंडळ आपापल्या आसनावर असा देखावा. एका राजसेवकाला कांही गुन्ह्याबद्दल राजासमोर आणण्यांत आले. सेवक कसा ? कसलेला पैलवान गडी. आणि राजा ? एक फाटक्या अंगाचा किरकोळ माणूस. सेवकानें कांही चमत्कारिक उत्तर दिलें. राजा रागावला. त्याने त्या सेवकाच्या श्रीमुखांत एक भडकावून दिली. पण सेवक शांत. नाटक नसते व येरव्ही असा प्रकार घडता तर त्या पैलवान सेवकानें बगोटे धरून राजाला उचलून फेकून दिला असता. पण आतां ? सेवक खाली मान घालून उभा होता. कां ? मूळचा तो कोणीही असला तरी या वेळी तो सेवकाच्या भूमिकेंत होता. भूमिकेचें अतिक्रमण करणें गैर आहे हें तो जाणत होता, म्हणून तो शांत राहिला. योग्य तेंच त्यानें केलें. जगाच्या रंगभूमीवर असेंच असावें. आपल्या भूमिकेला साजेसे व भूमिकेचे अतिक्रमण न होईल असेंच आपलें वर्तन असावें. पण पुष्कळ वेळा आपलें भूमिकेकडे दुर्लक्ष होते. यामुळें मोठमोठ्या विभूतीबद्दल आपण गैरसमज करून घेतो. श्रीकृष्णाबद्दलच पहा ना. परमेश्वरी अवतार, मग त्यानें सामान्य माणसाप्रमाणें

लटपटी सटपटी करून कालहरण करण्याची काय जरूरी ? पांडवांच्या वतीनें शिष्टाई करायला गेलेला कृष्ण वाटाघाटी निर्फळ झाल्यामुळे परत जात असता वाटेंत त्याला उत्यंग ऋषि भेटले. उत्यंगऋषींनी क्षेम कुशल विचारून शिष्टाईची फलश्रुती काय झाली म्हणून चौकशी केली. जें घडले तें कृष्णानें सांगितले. तें ऐकून उत्यंग ऋषीला राग आला. ते म्हणाले, "कृष्णा, तुला शाप दिला पाहिजे. तूं परमेश्वरासारखा परमेश्वर असून दुष्ट दुर्योधन दुःशासनासमोर नमते घेऊन तूं परमेश्वरी सामर्थ्याचा अवमान केला आहेस. तुला कौरवांना तुझ्या पायाशी एका क्षणांत नमवता आले नसते काय ? मग कशाला उगाच भिजत घोंगडे ठेवून तेढअन्याय वाढवीत राहिला आहेस ? परमेश्वरानें उघडया डोळ्यांनीं या अशा गोष्टी पहात बसावयाचे काय ? तुला शिक्षाच करायला पाहिजे." कृष्ण म्हणाला, "मुनिवरा, मी परमेश्वर असलों तरी मानवी भूमिकेंत वावरत आहें हें मला विसरतां येत नाहीं. मानवी मर्यादा मला राखल्या पाहिजेत. असें जर न केलें तर मानवी बुद्धि,मुत्सद्देगिरी व पराक्रम यांना काय महत्त्व राहील ? या व्यवहारांत आपली जी भूमिका असेल तिला धरूनच वागण्यांत व्यवहार व शहाणपणा आहे. असें करणें म्हणजेच परमेश्वरी सत्तेचा मान राखणें आहे." जादुगारानें खेळ करतांना जादू वापरावी पण उठल्या-सुटल्या त्याने तसें करणें योग्य होईल काय ?

# स्फूर्ति

असंख्य वारे अतृप्त होऊन
सैरावैरा धावुं लागले
रजनीच्या काळजास कोणी
क्रूरपणाने ओरबाडलें ॥ १ ॥

रक्ताळुन मग निथळत होते
ढगाढगांतुन काळें पाणी
आज दिसावा चंद्र इथे पण
ढगाळले गगनाला कोती ॥ २ ॥

खिदळत झाडे पिसाटापरी
एक भूत यांसवे खेळतें
भरत्या नदिच्या पाण्यासंगे
काळोखाचे बिंब लोळतें ॥ ३ ॥

असा समय पाहून भयानक
अंतरात कुणि खलबत करिते
बघ सृष्टीवर प्रलय मातला
याचक्षणी भांडार करु रितें ॥ ४ ॥

कवि—**दादा दाभोलकर**

# दुसरा डोळा कधीं उघडणार ?

## ( उत्तरार्ध )

लेखक : द. शं. टिपणीस

धर्माच्या बाबतींत अंधश्रद्धेचा वापर केलेला पाहिला कीं धर्माच्या भवितव्याविषयी शंका वाटते. धार्मिक गोष्टींवर अंधपणें श्रद्धा ठेवणारा तो आस्तिक व चिकित्सक व बुद्धीनें पहाणारा तो नास्तिक असें होऊन गेलें आहे. सर्वांत घातूक गोष्ट म्हणजे आमचे धर्म पुढारी अंधश्रद्धा नाहीशी करण्याचा प्रयत्न करीत नाहीत. उलट ती राहावीच असा प्रयत्न करतात. दुसऱ्या डोळ्यांना राजकारणांत अधूनमधून थोडेंसे दिसतें. पण येथें पूर्ण अंधकार. लोकशाही असल्यामुळें आज ना उद्यां नेत्यांत बदल होऊन राजकारणांत सुधारणा होण्याची आशा करण्याला जागा आहे. पण धर्मकारणांत तीही नाहीं. एक एकजण काय-मच्या वंशपरंपरा चालणाऱ्या गाद्या अडवून बसले आहेत. कारण धर्मकारणांत लोकशाहीचा उदय व्हावयाचा आहे. खरा अध्यात्म दृष्टीस पडूं नये म्हणून अंधश्रद्धेचे आवरण जेवढें दाट करता येईल तेवढें करण्याचा प्रयत्न होत असतो. राजकारणापेक्षांही अंधश्रद्धेचा सुळसुळाट धर्मकारणांत जास्त आहे. खुळ्या सम-जुती, वेडेचार, भ्रामक कल्पना, दैवताच्या उपासनेपेक्षां त्याच्या भोवती अस-लेल्या रुढी रीती यांना फाजील महत्त्वच नव्हे तर त्यांचे अवडंबर, तत्त्व एक व आचार दुसरा, विचार व आचार यांचा मेळ नसणें, सर्वांत घातूक गोष्ट म्हणजे धर्माचा बाजार मांडून गिऱ्हाईक स्वस्त माल विकणाऱ्या लोकांचा सुळसुळाट वगैरे नाना गोष्टी आज धर्मकारणांत चालू आहेत. धर्म व तो आचरणांत आणण्याची साधनें यांत साधनेच धर्म होऊन बसला व मूळ धर्म साधनाच्या मागें दडला गेला. साधनांलाच अधिक महत्त्व व त्यांचाच अधिक बडेजाव.

यामुळे मूळ बाजूला राहिलें व खूळ महत्त्वास आलें. श्रद्धा, भक्ती व भावना या मानवाच्या ठिकाणीं उपजत असलेल्या गोष्टींच्या भांडवलावर आज धर्माचा बाजार तेजींत आहे. व्यापारी लोकही या गोष्टींचा फायदा घेऊन आपला गल्ला भरीत असतात. श्रावण मास, गणपती गौरी, नवरात्र वगैरे धार्मिक सणांत वा उत्सवांत भडकलेले भाव पाहून मध्यम वर्गीय भक्तांची किती केविलवाणी स्थिति होते हे जावे त्याच्या वंशा तेव्हां कळे. भावना आंधळी असते. योग्यायोग्यतेचा निवाडा करण्याची बुद्धीसारखी तिच्या ठिकाणी ताकद नाहीं. अग्नि हा चांगलाही नाहीं व वाईटही नाहीं. जसा उपयोग करावा तसा तो ठरेल. योग्य प्रकारे वापरला तर चांगली पाकनिष्पत्ती होऊन अनेकांच्या मुखांत सुंदर घास जातील पण दुसऱ्याच्या घरावर ठेवला तर तोच अग्नि अनेकांची घरे जाळील. असाच प्रकार वरील गोष्टींचा आहे, भक्ति व श्रद्धा कीं ज्यांची अध्यात्मांत अत्यंत जरुरी आहे त्यांचा चांगला उपयोग करवून घेतला तर आत्मोन्नतीस त्या पोषक होतील, आपल्या आवडीची उपासना स्वीकारतांना कां व कसे हे अगोदर माहीत करून घेतले पाहिजे, ज्याची उपासना करावयाची ते उपास्य दैवत काय आहे, त्याच्या उपासनेमुळे कोणता फायदा होईल, त्या फायद्यामुळं आपलें आध्यात्मिक जीवन किती उंचावेल, एवढेच नव्हे तर आध्यात्मिक जीवनाला साहाय्यभूत होईल असे ऐहिक जीवन जगण्यासाठी त्या उपास्य दैवताकडून किती साहाय्य मिळेल व त्यासाठी कोणता आचार पाळावा लागेल या सर्व गोष्टींची पूर्ण माहिती घेऊन, खात्री करून व त्या उपासनेतील गोष्टी आपणास पेलतील कीं नाहींत याचा बुद्धीच्या साह्याने अंदाज घेऊन मग श्रद्धा, भक्ति, भावना, उपास्य दैवताला अर्पण करून शरणागती पत्करावी व मग त्या दैवताचे खुशाल दास होऊन राहावे, असें झालें तर ती खरी निष्ठा म्हणावयाची नाहीं तर ती अंधश्रद्धा ठरेल, सर्व साधारण जनतेला कशा प्रकारे खोल विचार करणे शक्य नाहीं हें खरें व म्हणूनच आमच्या विचारवंत धर्म नेत्यानी या सर्व गोष्टीची खुलासेवार माहिती जनतेला तिला समजेल अशा भाषेंत करून दिली पाहिजे. पण नेमकें हेंच केलें जात नाहीं, बदामाच्या गराची महती सांगण्याऐवजी वरच्या टरफलाचेच महत्त्व ठसविण्याचा व तेंच चघळवून घेण्याचा उद्योग धर्मरक्षणाची जबाबदारी घेतलेले नेते करीत असतात. यामुळें अंधश्रद्धा जाणार कशी, डोळा सुधारण्यार कधी व लोक डोळसपणें धर्माकडे बघणार कधी? ही सर्व सुधारणा कशी

घडवून आणावी हें आजच्या औद्योगिक कोड्यासारखें एक कोडेंच होऊन बसले आहे. मालाची भरपूर निर्मिती झाली तर मालाचा व्हावा तसा उठाव होत नाहीं. निर्मिती थांबवावी तर बेकारी वाढते. ती वाढूं नये म्हणून कारखाने चालू ठेवावे लागतात. असें केलें तर मालाला उठाव आला नाहीं तर काम तोट्यांत येतें-बेकारी होऊं नये, निर्मिती भरपूर व्हावी व सर्व मालाचा उठाव व्हावा ऐवढें-च नव्हे तर अधिकाधिक कारखाने निघावेत हें एकदम सर्व कसें साधावें हा प्रश्न विचारवंतांना पडला आहे. असेंच धर्मकारणांत अंधश्रद्धा घालवावी, डोळे साफ करा-वेत व लोकांना स्वच्छ दृष्टीनें धर्माकडे पहाण्यास शिकवावें. हें सर्व खरें आहे पण या धर्मतंत्रावर जगणाऱ्या हजारों लोकांचे काय ? अंधश्रद्धा कमी झाली तर हे लोक बेकार होतील. तसें होऊं नये तर अंधश्रद्धा वाढवीत ठेवली पाहिजे. औद्योगिक बेकारीप्रमाणें ही धार्मिक बेकारी हाही एक कूट प्रश्न आहे. तो हिंदुधर्माच्या गुरुजनांनी व आचार्यांनी सोडविला पाहिजे. पण तसा यत्न कोणी फारसा करीत नाहीं. केला तर कांहींना कांहीं मार्ग सांपडेल, एवढे बाकी खरें कीं आपलें पोट भरण्यासाठीं जनतेला अज्ञानांत ठेवणें हे इंग्रजांनीं भारतीयांना गुलामगिरींत ठेवलें किंवा मुसलमान सुलतांनानीं देवळे पाडली व धर्म बाटवला यांपेक्षांही अनुचित आहे.

धर्मकारणांत जो काहीं गोंधळ चालला आहे तो धर्मामुळें नव्हे तर धर्म-तंत्रामुळें. कोणीसा म्हणाला धर्म ही अफू आहे. खरें म्हणजे धर्म ही अफू नसून धर्मतंत्र ही अफू जनतेला पाजण्यांतही अफू आहे. हें सर्व कशासाठी तर स्वार्थासाठी. जिकडे तिकडे धर्माच्या बाबतींत सरळ सरळ सौदे चालू असतात. यांस थोडासा जरी विरोध झाला तर सौदेबहाद्दर सरळ विचारतात की मग आम्हांला नको का कांही पोटासाठी ? जणूं कांही यांची पोटें भरण्यासाठींच धर्म अवतरला ! धर्म म्हणजे जणूं कांही एक मोठा कारखाना व ठेकेदारांची पोटें जर त्या कारखान्यामुळें भरलीं नाहींत तर मग कारखाना चाल-वायाचा तरी कशाला ? ही ह्यांची कल्पना. अगदीं सरळ मामला आहे हा. मला पेन्सिल पाहिजे होती म्हणून ती मी शेजारच्या मुलीची हिसकावून घेतली त्यांत काय बिघडलं ? असें लहान मुले म्हणतात ना त्यांतलाच हा प्रकार. कोणतीही गोष्ट पैसे मिळविण्यासाठी वापरली की ती अपवित्र होते. तिच्यातील

शक्ति व जोस ओसरतो. यामुळे आमच्या ठिकाणीं तेज व जोम उत्पन्न होत नाहीं. स्वतः पूजा न करता दुसऱ्याकडून त्याला पैसे देऊन पूजा करवून घेण्याचें भ्रामक धर्मतंत्र सरसहा प्रचारांत आहे. साधना करण्याचा आळस, वेळेचा अभाव, पुण्य मिळविण्याचा हव्यास. यामुळें सगळ्या धर्मतंत्रांत पुण्य मिळवून देणारे ठेकेदार फिरत असतात व जिकडे तिकडे बाजारभाव लागलेले असतात. १।रु. दिला कीं आपल्या वतीनें सहस्रनाम केलें जातें व सहस्रवेळां नामस्मरण केल्याचें पुण्य यजमानास मिळते. बारा आणे देऊन कोणी आपल्या नांवें देवळांत अभिषेक केला पुण्य आपल्या घरीं येते व पैसे त्याच्या खिशांत जातात. दोघांचेही कल्याण, स्वतःला पारायण करतां येत नाहीं मग सांगा कोणाला. द्या पैसे व ध्या करवून आणि मिळवा पुण्य, ही रीत एकदां सुरू झाली कीं जसे पैसे तसा माल हें आलेंच, मागणी तसा पुरवठा हें व्यापारी तत्त्व जिकडे तिकडे चालू आहे. लग्न व मुंजी कार्यातही किती वेळांत व किती पैशात बोला हा सवाल. कोणतेंही धार्मिक कार्य अथपासून इति पर्यंत तुम्हाला पाहिजे तसें करण्याची ठेकेदारी घेणारे ठेकेदार आहेत, बरं, या ठेकेदारांच्या धर्मतंत्रांत एक मेकाशीं मेळ असावा तर तेही नाहीं. ज्यांच्या शिरावर धर्मरक्षणाची व लोकांना खऱ्या धर्ममार्गाला लावण्याची जबाबदारी त्यांनींच धर्मतंत्राचा असा बाजार मांडल्यावर धर्म हा आचरणांत आणण्यासाठीं, स्वतः अनुभवण्यासाठीं आहे ही वेदाची शिकवण वाऱ्यावर गेली व हा सर्व प्रकार पाहून आजच्या बुद्धिवादी तरुण पिढीला हा सर्व खुळचट व भ्रमाचा बाजार वाटून त्यांची धर्मश्रद्धा डळमळली तर नवल नाहीं. त्यांनीं धर्म तंत्राची चेष्टा आरंभली तर तो काय त्यांचा दोष म्हणावयाचा ? अशाना 'नास्तिक' अशी चिठ्ठी लावून बाजूला सारल्यानें काम भागायचें नाही. केव्हांनां तरी आमच्या धर्म श्रेष्ठीना सत्याला तोंड देणें भाग पडणार आहे. वास्तविक आज उलट स्थिति झाली आहे. ज्यांना आपण नास्तिक म्हणतो ते पुष्कळ वेळां खरे आस्तिक असतात व ज्यांना आस्तिक म्हणतों त्यांतील बऱ्याचशांनीं स्वार्थ छपविण्यासाठीं आस्तिकतेचें ढोंग पांघरलेलें असतें. आमचें धर्मतंत्र सदाचारापेक्षां पैशावर आधारलेलें आहे. पैसा म्हटला की लोभ आला. स्वार्थ म्हटला कीं लोभ आलाच. कोणत्याही कार्यात मग तें धर्मकारण कां असेना लोभ आला की कार्याचा विचका झालाच. कार्याला पैसा पाहिजे हें पूर्ण खरें आहे, पण पैसा अग्निसारखा आहे हेंही तित-

केच खरें आहे. आमचे धर्म रक्षणकरते भीतीची बुजागावणी व पापाचे बडगे उगारून लोकांना भयभीत करतात. भीति व पाप यांतून मुक्त होण्यासाठी ते सांगतील तें ऐकण्यास बिचारे लोक तयार होतात, प्रभू रामचंद्राला भय दाखवून पळून जाण्याचा ज्यांनी उपदेश केला ( भावार्थ रामायण ) ते तुम्हा आम्हांला काय जुमानणार ? असुक केलें नाही तर देवाचा कोप होईल, हें करा म्हणजे स्वर्गात जाल नाहीतर पडाल नरकांत खिचपत. बिचारे लोक घाबरतात काय घ्यायचें तें घ्या आणि काय करायचें तें टाका करून म्हणून तयार होतात; आपलें वर्चस्व राहावें व चलती व्हावी यासाठी धर्मतंत्राच्या आडगळीचा हा खोडा जनतेच्या पायांत अडकवून ठेवल्यामुळें शेंकडों वर्षे झाली तरी आम्ही सदाचारापासून दूर आहोंत ते आहोंत, दिवसेंदिवस अधिकाधिक दूर जात आहोंत. इंग्रजांनी अडकवलेल्या खोड्यापेक्षां हा खोडा अधिक घातूक आहे. ज्ञानदाना- सारखें पुण्य नाही असें सांगणाऱ्या धर्माच्या अनुयायांनी जनतेची दिशाभूल करून तिची बुद्धि मारून तिला अज्ञानांत ठेवणें हें महत्पाप आहे. ज्ञानेश्वरा- पासूनच्या सर्व संतानी खरा धर्म कोणता हें दाखवून आम्हाला जागे करण्याचा भरपूर प्रयत्न केला आहे. तुकारामानें तर ढोंगावर फटके उडविले आहेत. पण नाही. आमचे डोळे कांही उघडत नाहीत. संतांची भूमि असलेल्या या महाराष्ट्रां- तील आम्ही अजूनही कोरडेच राहिलों आहोंत हें दुर्दैवच म्हणावयाचें. ५-५० असलेल्या शिक्षकांनी शिकवावे पण विद्यार्थ्यांच्या डोक्यात प्रकाश पडू नये, अशातला हा प्रकार. ज्ञानेश्वरादि अत्यंत उच्च कोटीतील संत शेकडों वर्षे आम्हास खरा धर्म शिकवीत आहेत तरी आम्ही मठ्ठच. हें काय भूषण कीं दूषण ? सर्वाभूती परमेश्वर पहाणें, दया करणें, आपल्याप्रमाणे इतरांची भूक या जाणी- वेनें वागणें, लोभाचा स्पर्श होऊ न देणे, संयम राखणे वगैरे कितीतरी खऱ्या धर्मातील गोष्टींकडे आपलें लक्ष वेधण्याचा संतानीं प्रयत्न केला आहे व योग्य आचार धर्म दाखविला आहे. पण धर्मतंत्राने आम्हांस आंधळे करून ठेवल्यामुळे या गोष्टी आमच्या लक्षांत येत नाहींत. ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथांचे आम्ही पारायण करतो, त्यांवर प्रवचने करतो, व्याख्याने देतो, शब्द, शाई, कागद हवें तेवढें खर्च करतों, पण आचरणाच्या नांवाने शून्य. हें जोपर्यंत चालू आहे तोंपर्यंत आमचा आध्यात्मिक डोळा अधूच राहणार. तो बरा करायला स्वामी विवेकानंद किंवा साईबाबा यांच्यासारखे क्रांतिकारी संत पाहिजेत, नाहींतर परिस्थितीने आमच्या

पाठीवर तडाखे तरी दिले पाहिजेत. माणसापेक्षा बहुतेक परिस्थितीच आम्हांस जागे करील असें दिसतें. जातीपातीची अनर लग्नासंबंधीं बंधने जी कांहीं शिथील झाली आहेत ती परिस्थितीनें तसें करावयास आम्हाला भाग पाडलें म्हणून. पण परिस्थिती सर्व करील असें म्हणून आपण स्वस्थ बसावें काय? वैद्य येईल व औषध देईल अशी वाट पहात बसण्यापेक्षां ज्याचा त्यानें आपला डोळा सुधारण्याचा प्रयत्न कां करू नये? नामस्मरण हें अगदीं सोपे व सहज मिळणारें औषध आहे. त्याला वेळ, ठिकाण, पैसा जाति वगैरेची बंधने नाहीं. त्यांत अडते ठेकेदार व मध्यस्थ यांना लुडबुड करण्यास जागा नाहींत. नामस्मरणाची कास धरली तर आपली आध्यात्मिक दृष्टी साफ होऊन एकात्मता, विश्वबंधुत्व, संयम वगैरे गोष्टी साध्य होतील व जीवनाचें कल्याण होईल. हा साधा उपाय, हे साधे बिनखर्चाचें व पथ्याचें औषध आमच्या संतांनीं देऊन ठेवलें आहे, तें तरी आपण वापरायला काय हरकत आहे?

## खरा आनंद

मनुष्य ज्याचें सदासर्वकाळ चिंतन करतो त्याप्रमाणें त्याच्याकडून क्रिया घडत जाते. व त्याच वातावरणाचा त्याच्या मनावर घनदाट पगडा बसत असतो.

विषयांचें चिंतन करीत रहाणें म्हणजे स्वतःचें पतन आहे. हें पतन तुम्हीं पत्करणार का? त्यांत शाश्वत नि कल्याणकारी सुख मुळींच नाहीं. शाश्वत सुख आहे ईश्वरचिंतनांत. त्यांत तुमचें उत्थापन व वैभव सामावलेले आहे.

विषयचिंतन, विषयासक्ती विषयकामना, सुखोपभोग यांचा शेवट सुखांत नाहीं तर दुःखांतच व्हावयाचा असतो. तुमचें मन आणि शरीर त्यांत जळून खाक व्हायचें असतें. दुःखाच्या खाईंत लोटणाऱ्या त्या गोष्टी आहेत!

तुम्हीं जों जों विषय वासना पूर्ण करून घेण्याच्या मागें लागाल तों तों तत्संबंधींची तृष्णा कमी न होतां ती वाढतच जाईल, हें विसरू नका. खराखुरा आनंद कशांत आहे सांगू? तो विषयवासना पूर्ततेच्यामागें लागण्यांत नाहीं तर त्या वासनांवर विजय मिळविण्यांतच आहे।

# श्रीगुरुपौर्णिमा उत्सव १९६९

दिनांक २८ जुलै, दि. २९ जुलै दि. ३० जुलै, १९६९ रोजः –
(सोमवार, मंगळवार, बुधवार)

श्री साईबाबा संस्थान शिर्डी तर्फे श्रींचे समाधिमंदिरात सालाबाद-प्रमाणें श्रीगुरुपौर्णिमा उत्सव तीन दिवस थाटांत साजरा झाला.

या उत्सवाची पूर्वतयारी म्हणून मे. रिसीव्हर डी. डी. पाटणकरसाहेब यांनीं खातेप्रमुखांची सभा आगाऊ एक महिना घेऊन कार्यक्रमांची रूपरेषा ठरविली. त्याप्रमाणें मांडव घालणें, भक्तांच्या राहाण्याच्या खोल्यांची साफसफाई-ची, पिण्याच्या पाण्याची, स्नानाची, भोजन-फराळाची, कलाकार, गायन, कीर्तन, वादन वगैरे कार्यक्रमांची, पोथीपठन, फोटो, रथपालखी मिरवणुकीची, वाजंत्री, ब्यांड, चौघडा, सनईची वगैरे खर्चाची व्यवस्था ठरविणेत आली.

उत्सवाचा कार्यक्रम दि. २८ सोमवारी पहांटे नित्य कार्यक्रमाखेरीज मंदिरांतून श्रींच्या फोटो पोथीची मिरवणूक गुरुपादुकामार्गे श्रींचे द्वाकारमाईंत स्थापना व पोथीपठणास प्रारंभ. श्रींचे मंदिरांत भक्तांच्या सामुदायिक पूजा, अभिषेक, श्रींच्या वस्त्रांची प्रसादरूपानें विक्री. दुपारी ४॥ ते ६॥ पर्यंत संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांचे श्रीमंदिरात कीर्तन. रात्रौ ९ ते ११ पर्यंत श्रींच्या पालखीची गांवांतून मिरवणूक वगैरे कार्यक्रम झाले.

दि. २९ मंगळवार रोजी नित्य कार्यक्रमाखेरीज श्रींच्या फोटोपोथीची श्रींचे द्वारकामाईतून पादुकामार्गे मिरवणूक. भक्तांचे सामुदायिक अभिषेक, पूजन, श्रींच्या वस्त्रांची प्रसादरूपाने विक्री. दुपारी ४॥ ते ६॥ पर्यंत श्री. ह. भ. प. विश्वनाथबुवा आळेकर पुणे यांचे श्रीमंदिरांत सुश्राव्य कीर्तन, रात्रौ ९ ते ११ पर्यत श्रींचे रथाची गांवांतून मिरवणूक, भारुडभारूड, भजन, नकला वगैरे. नंतर श्रीमंदिरात रात्रभर, जागर कला-कारांच्या हजेऱ्या. एकदंर ४० कलाकारांनी यांत भाग घेतला होता. त्याना

साईसंस्थान तर्फे प्रत्येकास एक रुपया, नारळ, प्रसाद देण्यांत आला. कलाकारांत शास्त्रीय (ख्याल गायक ) श्री, वसंतराव किणीकर, स्टेशनमास्तर कोपरगांव, सौ. शुभलक्ष्मी नारायण थत्ते व कुमारी पद्मजा नारायण थत्ते श्रीरामपूर व तबलावादनकार श्री, पांडोबा गुरव श्रीरामपूर व हार्मोनियमवादक राजाभाऊ देशपांडे पुणे, यांचा गायनाचा कार्यक्रम फारच बहारदार झाला. तसेच गीत-रामायणगायक श्री, श्रीपाद शंकराव साठे पुणेकर व सनईवादनकार श्री मनोहर लोणकर पुणे श्री. वसंतराव देवळणकर पुणे, श्री, दामुआण्णा दळवी श्रीरामपूर, यानी सनईवादन फारच सुंदर करून रंग भरला, तसेच कुमार विकास बाळकृष्ण पुरंदरे पुणे, याचे तबला सोलो वादन फारच उत्तम झाले, तसेच श्री, रघुनाथ बाबुराव सांडभोर पुणे, यांच्या गारूड, भारूड, नकला फारच उत्तम झाल्या,

दि. ३० बुधवार रोजी नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांची सामुदयिक अभिषेक पूजा व प्रसादरुपानें वस्त्रांची विक्री व ११ ते १२ पर्यंत संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांचे गोपालकाला कीर्तन, दहीहंडी, तीर्थप्रसाद होऊन उत्सव समाप्त झाल्याचे जाहीर केले. उत्सवानिमित्त भक्तांना नेहमीचे दरात पक्कान्न तीन दिवस अधिकृत भोजनगृहामार्फत जादा दर संस्थानतर्फे देऊन भोजन दिले. तसेच संस्थान नोकर सेवेकरी सन्माननीय पाहुणे याना फराळ तीन दिवस (लाडू चिवडा) देण्यात आला. तसेच सं. नोकर, सेवेकरी, याना एक दिवस मिष्टान्नाचे भोजन संस्थानतर्फे देण्यात आलें, या उत्सवात मुंबई पुणें कडील भक्तांची गर्दी यंदा थोडी कमी प्रमाणात होती. पण पंढरपूरच्या यात्रेकरुंची खानदेश वऱ्हाड, नागपूर, अमरावती यांची मात्र गर्दी भयंकर होती. श्रींचे दर्शन घेऊन ताबडतोब परत जाणारांची गर्दीही भयंकर होती. येणें प्रमाणें उत्सव कार्यक्रम उत्तम तऱ्हेनें पार पडला.

# देई "अढळपद"

कुणा देशी स्वर्ग देवा कुणा देशी मोक्ष पद
मला ने 'बा' चरणांपाशी देई अढळपद. ॥ -१-

थोर संत मुनी जना मिळालासे स्वर्ग
थोर पुण्य महात्म्यांना खुला मुक्ती मार्ग. ॥ -२-

नको नको देऊ मज पुन्हा जन्म मानवाचा
नको देऊ नरकवास नरराक्षसांचा. ॥ -३-

काय पाप झाले देवा अधिक पुण्य माया
पूर्वजन्मी झाले म्हणुनी मिळाली ही काया. ॥ -४-

विधी लिखित कांहीं माझे असे तुझ्या हाती
प्रेमभाव राहो सर्वा सदाकाळ अन्ती. ॥ -५-

अन्तकाळी नच होवो कष्ट या जीवाला
मरण दे 'बा' मज ऐसे कष्ट ना कुणाला. ॥ -६-

तूंच घडविली काया तूंच दे 'बा' मूठमाती
नको जाऊ देऊ काया कुणाचेही हाती. ॥ -७-

मागणें 'बा' हेच आता नको वादा वाद
मला ने 'बा' चरणांपाशी देई अढळपद. ॥ -८-

लेखक:--डी. बी. पोतनीस

# सोमवारीं देव नाचले

**ले. द. श. टिपणीस**

सोमवार तारीख २१ जुलै ६९ रोजी मानवाने एक उच्चांक गाठला. चंद्रावर प्रथमतःच मानवाने पाऊल ठेवले. एवढेंच नव्हे तर दोन मानव कांही वेळ चंद्रपृष्ठभागावर फिरले. चंद्राच्या पृष्ठभागाचे त्यांनी निरीक्षण केले व ज्ञानाचा अमृतकलश घेऊन ते परत आले. विज्ञानानें आपल्या टोपीत आणखी एक पराक्रमाचें पीस खोवले. आपले घर सोडून दुसऱ्याच्या घरांत शिरण्याचा पराक्रम सृष्टीउत्पत्तीनंतर प्रथमच त्या सोमवारी करण्यांत आला. लक्षावधि मानवांनीं हा पराक्रम प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिला. भाग्यवान बेटे ! हें ज्यांना शक्य नव्हतें त्यांनी त्या पराक्रमाचे वर्णन कानांनी ऐकिले. हळहळले बिचारे टेलिव्हिजन नाही म्हणून! पृथ्वीवरील मानव जातीचे मानसिक सामर्थ्य त्या दिवशी या त्रिमूर्तींच्या मागे होते. हें सर्व ब्रह्मांडच त्रिमूर्तीने भरले आहे. पूर्वी व आतांही त्रिमूर्तींच ब्रह्मांडाचा एक अंश असा जो चंद्र त्याचा शोध घ्यायला गेल्या. त्यांना यश मिळाले. अमेरिका आनंदाने नाचली पण अमेरिकाच आनंदाने नाचली असें नव्हे तर—

त्या दिवशी आपल्या सुपुत्रांचा पराक्रम पहाण्यासाठी शंकरासह सर्व देव कैलास पर्वतावर जमले होते. जगातील सर्वांत उंच ठिकाणाहून मानव कसा काय पराक्रम करतो आहे हें ते पहात होते. त्यांच्या डोळयांतच टेलिव्हिजन असल्यामुळें त्यांना सर्व कांही स्पष्ट दिसत होतें. मानव चंद्रावर उतरून इकडे तिकडे फिरू लागले तेव्हां सर्व देवांना आनंद झाला. डोळ्यांत आनंदाश्रू आले त्यांच्या. बापसे बेटा सवाई निघाला. मानव आपल्यापर्यंत आज ना उद्या हा येईल याची खात्री वाटून पुत्रवात्सल्यानें त्यांचे डोळे भरून आले. आपण ज्या ध्येयानें मानव निर्माण केला त्या ध्येयाकडे त्याची यशस्वी पाऊले पडताना पाहून त्यांच्या डोळ्यांत प्रेमाचें पाणी आलें. आम्ही लपवावे व मानवानें हुडकून काढावे. लपंडावाचा हा खेळ आम्ही व मानवांनी खेळावा व त्यांनीं आम्हास पराक्रमानें पराजीत करावें. हीच आमची इच्छा. आम्हाला तरी कोणी प्रतिस्पर्धी पाहिजे ना ? त्याशिवाय आमच्या सामर्थ्याला बहर कसा येईल ? आमचा प्रतीस्पर्धी तो हा मानव. आम्हीच त्याला निर्माण केला. आम्हाला शोभेल असाच तो

पराक्रम करतो आहे. आनंद वाटतो आम्हांला. आनंदाने आम्ही नाचतों आहोंत. त्यांनी मानवाला आशिर्वाद दिला.

देव म्हणाले, "बेट्या मानवा, शाबास, आमचे नांव धन्य केलेंस. बुद्धि, अक्कल इतर प्राण्यांकडे नाहींत अशा अनेक गोष्टी आम्ही तुला दिल्या. त्यांचें सामर्थ्य वाढवून व त्यांचा उपयोग करून तूं जो विश्वाचा शोध घेत आहेस तें पाहून आम्हाला धन्यता वाटते. कांही मानवांना भीति वाटते कीं तूं अशा गोष्टी केल्यास तर आमचा कोप होईल. जुनी बुद्धि उगाच घाबरते झालं. अरे, पुत्राचा पराक्रम पाहून पित्याला काय वाईट वाटेल? त्यायोगे त्याला काय कोप होईल? का आनंद वाटेल? तुमचा शिवाजी होताना? त्यानें नाहीं कां बापापेक्षां अधिक पराक्रम गाजविला? म्हणून काय शहाजीला वाईट वाटलें? त्याला आपल्या पुत्राचा राग आला की कौतुक वाटले? आम्ही तर तुला पराक्रमासाठीच जन्मास घातले, मग मानवा, तुझा पराक्रम पाहून आम्हाला कसा बरें राग येईल? आम्ही तुला काय शाप देऊं? नाही. आशिर्वादच आहे आमचा तुला. ज्ञानाचा निधि तूं वाढवीत आहेस, आनंद वाटतो आम्हाला हें पाहून. या ज्ञानाचा तूं जग-कल्याणासाठी उपयोग करीत आहेस तोपर्यंत आमचा पाठिंबा आहे तुला. एवढेंच नव्हे तर आमचें प्रत्यक्ष साह्यही आहे तुला. अरे, तुझ्याकडून विमानाचा शोध लावून घेतला तेव्हांच या अवकाशयात्रेची मुहूर्तमेढ आम्ही रोंवली. विमानाच्या शोधांत ज्यांनी आपलें बलिदान केलें आहे त्या वीरांना या आनंदाच्या प्रसंगी विसरूं नकोस. तुला मिळालेल्या ज्ञानाचा तूं दुरुपयोग करूं लागलास. त्यानें मानवता मरूं लागली तर मग चार गोष्टी तुला शिकविणें आम्हास भाग पडेल. एवढें पथ्य तुला पाळलें पाहिजे. आणखी एक गोष्ट विसरूं नकोस. तूं बाह्यसृष्टीचा शोध घेत आहेस. पण अंतर्‌सृष्टी म्हणून अजून एक तुला माहीत नसलेली सृष्टी आहे. ती तुझ्याच ठिकाणीं आहे. या बाह्यसृष्टीचा शोध घेतां-घेतां कदाचित तूं अंतर्‌सृष्टीत शिरशीलही. असें व्हावें ही आमची इच्छा आहे. तसें न झालें, अंतर्‌सृष्टीकडे दुर्लक्ष केलेस तर एक पाय लांब व दुसरा आखूड असलेल्या माणसाप्रमाणें तूं सदैव धडपडत चालत राहाशील व ज्या सुखासाठी तूं खटपट करीत आहेस तें तुला कधींच मिळणार नाहीं. तान्हेल्या माणसाप्रमाणें सदैव तळमळत राहाशील, हें विसरूं नकोस. मग खुशाल पुढें चल. यशवंत हो."

# शिरडी–वृत्त

## जुलै १९६९

या महिन्यात भक्तांची गर्दी बरीच होती. कारण एकतर पुरुषोत्तम् महिना आषाढ महिना, व गुरुपौर्णिमा उत्सव अशामुळें गर्दी बरीच झाली. कांही कलाकारानी हजेरी दिली ती खालील प्रमाणे.

**कीर्तन**

सौ. कमलाबाई रत्नपारखी. मु. म्हैसूर जि. अकोला.

श्री. ह. भ. प. विश्वनाथबुवा आळेकर मु. खेड जि. पुणे.

संस्थानगवई यांची कीर्तने नेहमी प्रमाणें झालीं.

**गायन**

श्री. जगन्नाथ पंडित देशमुख नागपूर.

श्री. अवधूत मयेकर डोंगरी ( मुंबई ).

श्री. विठ्ठल दादा पाटील दादेगांव ( औरंगाबाद ).

**नवल विशेष**

आषाढ शु. महाएकादशी निमित्त श्रीचे मंदिरात कीर्तने व गांवांतून श्रीच्या पालखीची मिरवणूक असा कार्यक्रम झाला.

**मोठयांच्या भेटी**

श्रीमती भरूचाबाई. मे. देव कमिशनर साहेब. मे. चिन्मुळगुंदसाहेब. पुणे या त्रीवर्गानी श्रीची महापूजा व सत्यनारायणपूजा केली.

**हवापाणी**

हवा कुंद; मधुन मधुन बारीक पाऊस, सूर्यदर्शन क्वचित, बाकी रोगराई कांहीं नाहीं.

---

**इंग्रजी विभाग**

कांहीं आकस्मिक अडचणीमुळें या अंकास इंग्रजी विभाग जोडणें शक्य झालें नाहीं. पुढील अंकीं त्याची भरपाई करण्यांत येईल.

—व्यवस्थापक

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**–by Pradhan | | | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | **साईबाबा-अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. घोंड | २-०० |
| (१०) | **साईबाबांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | **सगुणोपासना** | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१५) | **शीलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | **श्री साईगीतांजलि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (१८) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00-37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00-50 |

Other different poses of Saï baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Receiver Shri Sai Baba Sansthan,**
   P. O. Shirdi., Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office ' Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.